


# छात्र प्रबोधन

सौर भाद्रपद, शके १९३६ । वर्ष १४ अंक १२
वार्षिक वर्गणी ₹ १८०

ज्ञान प्रबोधिनीचे कुमारांसाठी, कृतिशीलता जोपासणारे मासिक!



## अमे गीत गगनतां गाशुं (गुजराथी गीत)

अमे गीत गगन नां गाशुं, रे अमे गीत मगन मां गाशुं
कल कल कूंजन सुणी पुछशो तमे: अरे छे आ शुं? ।।धृ।।

सूर्य चंद्र ने दियो होलवी, ठारो नवलख तारा.
हथेडी आडी राखी रोको, वरसंती जळधारा,
हे अमे सूर सरित मां न्हाशुं, अमे...।।१।।

जुओ रात दिन विहंग कोडे, कर्या करे कलशोर
सांज सवारे कोकिल, बुलबुल, मोडी राते भोर,
हे जंप्या विण गाये जाशुं, अमे... ।।२।।

पंखी मात्र ने मुनिव्रत आपो, चूप करीदो झरणां,
पूरो बेडीमां हृदय पर, नर्तन्तां प्रभु चरणां
हे ऊर मूकी मोकळां गाशुं, अमे... ।।३।।

प्रचंड जन कोलाहल वीथी, झमे ब्रह्म:ख झीणा
जंपि जाय जग त्यारे गाजे, तिमिरनी अनहद वीणा.
हे अे रहस्य स्वर कैलाशु अमे...।।४।।

(पद्याचा भावार्थ पान क्र. ९ वर वाचा.
पद्य संकेतस्थळावर ऐका.)

छात्र प्रबोधन आयोजित समूहगीत गायन स्पर्धेतील गीत
सादरकर्ते - विवेकानंद विद्यालय, चोपडा, जि. जळगाव



### गीताचा भावार्थ

**अमे गीत गगनतां गाशुं** (गुजराथी गीत)

आम्ही आकाशाचे गीत गाऊ, आम्ही मग्न होऊन गीत गाऊ. किणकिण निनाद करणाऱ्या या स्वरांना ऐकून तुम्ही विचारणार - 'अरे हे काय आहे?' सूर्य, चंद्र अस्ताला गेले आहेत. नवलाख तारे चमकायला लागले आहेत. हातावर पडणाऱ्या जलधारांना थांबवून घ्या. आम्ही सुरांच्या सरितेत न्हाऊन निघू. बघा, सर्व पक्षी रात्रंदिवस किलबिलाट करत आहेत.

सकाळ-संध्याकाळ कोकीळ, बुलबुल मंगल सुरात गात आहेत, म्हणून रात्र विभोर झाली आहे. आम्ही सर्व थकव्याला विसरून आकाशाचे गीत गाऊ. रात्री पक्षी जणूकाही मुनींसारखे ध्यानस्थ झाले आहेत. झऱ्यांनीसुद्धा मौनव्रत घेतले आहे. अशा या नीरव वातावरणात प्रत्येकाच्या हृदयात प्रभुप्रति भक्ती निर्माण होऊ द्या.

आम्ही दिलखुलास आकाशाचे गीत गाऊ. प्रचंड माणसांच्या गोंधळात, कलकलाटात या ब्रह्मनादाचा आवाज पसरू द्या. रात्रीच्या अंधारात जेव्हा सर्व जग झोपते तेव्हा मधुर वीणेचा झंकार करूया. अमर स्वरांच्या या गूढ निनादाचा अर्थ जाणून घेऊया.

# छात्र प्रबोधन

**सौर भाद्रपद, शके १९३६। वर्ष १४ अंक १२**

(मासिकाचा प्रारंभ : सौर श्रावण शके १९१४ (जुलै - ऑगस्ट १९९२) २६६ वा अंक, वर्ष २३ अंक २

**प्रकाशन दिनांक - सौर १० भाद्रपद, शके १९३६/१ सप्टेंबर २०१४**


ॐ

***इवली शल्ये रुपती खुपती***
***मात करू दे त्यांच्यावरती***
***प्रगल्भतेचे पंख देऊनी***
***ने ज्योतिर्जगतात***

## • अंतरंग •


**४. संवाद** - महेन्द्र सेठिया

**५.** कथा ... **चांदणी** - सरोज चौगुले

**१०.** कविता... **जिद्द** - डॉ. सुमन नवलकर

**११.** संस्था परिचय... **भांडारकर प्राच्यविद्या संशोधन मंदिर, पुणे** - श्रीनंद बापट

**१३.** व्यक्तिविकसन... **'स्मार्ट' आहे मी!** - सुनीला गोंधळेकर

**१६. विज्ञान प्रयोग** - डॉ. कांचनगंगा गंधे

**१७.** ललित... **एम फॉर मराठी** - आसावरी गोखले

**१९.** संवाद कौशल्य...१४ **संवादातील अडथळे** - स्मिता निरगुडकर

**२२.** कविता... **चिमण्यांनो...** - डॉ. अशोक कोळी

**२३.** व्यक्तिपरिचय... **'माणूस' म्हणून घडविणारे 'पाटील गुरुजी'** - समाधान पुजारी

**२५.** मुलांचे पान.. **परीक्षा नसत्या तर...** - चि. अर्चित देवधर
**अनोखे कास पठार** - कु. ऐश्वर्या पठारे

**२७.** स्फुटं... **नावातील गमती-जमती** - श्रीनिवास शारंगपाणी

**२८.** स्फुटं... **महान गणितज्ञ 'भास्कराचार्य २'** (भाग - ३) - किरण बर्वे

**२९. 'छात्र प्रबोधन' वर्ष १४ - अंकातील विशेष लक्षवेधी**

**३२. केंद्रप्रमुख संपर्क सूची**

**याशिवाय**- मुखपृष्ठाच्या आतील पद्याचा भावार्थ (९), ध्येयास ती महान टेनिसपटूची, थोडीशी गंमत (२१), प्रतिसादी वाचकवीर व्हा-(३४)


**या अंकातील पानाखालील ओळी कवयित्री आश्लेषा महाजन यांच्या आहेत.**

**तळटिपेतील ओळी** - भारतातील खेलरत्न पुरस्कारप्राप्त खेळाडूंच्या आहेत.

**मुखपृष्ठाविषयी** - दरवर्षी पावसाळ्यानंतर सातारा जिल्ह्यातील कास पठारावर निरनिराळी रानफुले टप्प्याटप्प्याने उगवल्यावर जणू काही रंगीत गालिचा पसरल्यासारखे वाटते. हे सारे निसर्गवैभव पाहून हरखून गेलेला माझा मुलगा, त्या फुलांचा एक भाग बनूनच ती फुलं वेचत होता. पटकन मी तो क्षण कॅमेऱ्यात टिपला व त्यावरून पेस्टल या रंगमाध्यमाचा वापर करून हे चित्र रंगवले. निळसर ग्रे रंगछटा असणारा व पेस्टलसाठी सुयोग्य पोत असणारा कागद मी त्यासाठी वापरला. गवत दाखवण्यासाठी छोटे रेषाखंड व फुलांसाठी छोटे छोटे रंगीत ठिपके चित्रात दर्शवले आहेत.

**- गोपाळ नांदुरकर**


**♦ संपादक, प्रकाशक, मुद्रक ♦**
महेन्द्र सेठिया

**♦ कार्यकारी संपादक ♦**
शिल्पा कुलकर्णी

**♦ संपादक मंडळ ♦**
शैलजा देशमुख,
नीलिमा करमरकर
डॉ. कांचनगंगा गंधे,
आश्लेषा महाजन

**♦ मुखपृष्ठ ♦**
गोपाळ नांदुरकर

**♦ आतील चित्रे ♦**
भरत केतकर



**♦ संपर्क पत्ता ♦**
छात्र प्रबोधन, ज्ञान प्रबोधिनी
५१०, सदाशिव पेठ, पुणे - 411030
☎ (०२०) २४२०७ १७४/१७९
**संकेतस्थळ**
www.chhatraprabodhan.org
**ई-मेल**
chhatraprabodhan@jnanaprabodhini.org



**मासिकाची वर्गणी**
वार्षिक: ₹ १८०, द्वैवार्षिक: ₹ ३४०,
त्रैवार्षिक: ₹ ५००,
दशवार्षिक: ₹ १,५००.
**या अंकाची किंमत : ₹ १५**
(पुण्याबाहेरील धनादेशासाठी- ₹ २० जादा,
घरपोच दिवाळी अंकासाठी
प्रतिवर्षी ₹ ४० जादा)



**या नियतकालिकास महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाकडून अनुदानापोटी काही रक्कम प्राप्त झाली आहे. परंतु या नियतकालिकात प्रसिद्ध झालेली मते महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळास मान्य असतीलच असे नाही.**


**छात्र प्रबोधन : निव्वळ मासिक नव्हे !... विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकसनाची चळवळ !!**

**प्रिय देशप्रेमी प्रबोधकांनो,**

संवाद

हा अंक तुमच्या हातात पडेल, तेव्हा गणेशोत्सवाची धामधूम संपून सहामाही परीक्षेचे वेध लागलेले असतील. यावर्षी गणेशोत्सव कसा साजरा केला? शाळेत/गल्लीत/सोसायटीत/घरी काही वेगळं करून पाहिलंत का? गणपती ही विद्येची देवता, बुद्धीची देवता, कलांची देवता, संघटितपणे काम करणाऱ्यांसाठीची देवता! गणेशोत्सव साजरा करायचा, तो गणपती ज्या गुणांची देवता म्हणून आपण ओळखतो त्या गुणांची अभिव्य ती करण्यासाठी, ते गुण वाढविणारे उपक्रम करण्यासाठी ! हा उत्सव सार्वजनिकरित्या साजरा करताना, या उत्सवाच्या कालावधीत सामाजिक प्रश्नांबद्दल जाणीव-जागृती करणे, त्यावरील उपायांची अंमलबजावणी करायला प्रारंभ करणे या गोष्टीही आवर्जून व्हायला हव्यात. यावर्षी सप्टेंबर महिन्याच्या अखेरीस नवरात्रीच्या उत्सवाला प्रारंभ होईल. नऊ रात्री नऊ देवींची पूजा मांडायची म्हणजे त्यांच्या गुणांची आठवण ठेवून, ते आपल्यामध्ये यावेत यासाठी प्रयत्न करण्याचा संकल्प करायचा. त्यासाठीचे उपक्रम, कार्यक्रम करायचे. असे प्रत्येक सण-समारंभ-उत्सव काळाशी सुसंगत व मूळ अर्थाची सुसंगत राहून, उत्साह-ऊर्जा यांना पुरेपूर संधी देऊन साजरे व्हायला हवेत. चुकीच्या प्रथा, कालबाह्य रूढी, कर्मकांडाचे अवडंबर, भीतीपोटी वा लोभापोटी केलेल्या प्रार्थना या बाजूला ठेवून; त्याच्या जागी काळानुरूप योग्य बदल केलेले अर्थपूण संस्कार-उपक्रम-प्रार्थना-संकल्पांची भर घालणं, मोठ्यांच्या मदतीनं तुम्हाला जमायला हवं. असं करणं, म्हणजे या देशावर मनापासून प्रेम करणंच आहे.

यावर्षी १५ ऑगस्टला स्वातंत्र्यदिनी लाल किल्ल्यावरून राष्ट्रध्वज फडकविल्यानंतर आपल्या देशाचे पंतप्रधान आदरणीय नरेंद्रजी मोदी यांनी केलेले भाषण तुम्ही ऐकलं का? वाचलं का? अनेक महत्त्वाच्या मुद्द्यांना त्यांनी स्पर्श केला होता. तुमच्या संदर्भात बोलायचं झालं तर त्यांनी ज्या ३-४ घोषणा/घोषवा ये उच्चारली; त्याकडे मला तुमचे लक्ष वेधायचे आहे. त्यातील एक होती 'Clean India'... **'स्वच्छ भारत !'** खरोखरीच सार्वजनिक ठिकाणची अस्वच्छता याची आपल्याला शरम वाटते का? मनापासून घृणा वाटते का? तशी वाटली तर ती आपण करणार नाहीच; पण दुसरं कोणी करत असेल, तर त्यानी तसं करू नये , यासाठी आपण प्रयत्नशील राहू ! दुसरी होती 'Skilled India'... **'कुशल भारत'.** आपण घेत असलेलं पुस्तकी शिक्षण पुरेसं नाही. कोणत्यातरी प्रकारची कौशल्ये शालेय वयापासूनच आपण हस्तगत करायला हवीत. त्या कौशल्यांमध्ये पारंगत व्हायला हवं. त्यासाठी आत्तापासूनच सुट्टीतला वेळ जाणीवपूर्वक वापरायला हवा.


तिसरी घोषणा होती **'Make in India... Made in India'.** परदेशी लोकांनी आपलं भवितव्य भारतात घडवावं आणि भारतीय व्य ती बाहेर जातील, भारतीय व्य तींनी तयार केलेल्या वस्तू-सेवा जेव्हा निर्यात होतील तेव्हा त्या अशा दर्जाच्या असतील, त्या व्य तींचं वागणं, बोलणं अशा गुणवत्तेचं असेल, की सर्वांनी आदरानं-सन्मानानं 'तुम्ही भारतीय आहात म्हणून तुमच्या गुणवत्तेबद्दल आम्हाला खात्री आहे', असं म्हणावं. तसं घडायचं असेल तर शालेय वयापासूनच 'गुणवत्तेत तडजोड नाही' , 'जे करू ते उत्तमातलं उत्तमच करू' अशी वृत्ती जोपासायला हवी. त्यासाठी जादाचे परिश्रम करायची, मेहनत घ्यायची तयारी हवी. आपल्या छोट्या-मोठ्या कृतींमधून ते व्य त व्हायला हवं. चौथी घोषणा होती **'Digital India'.** तंत्रज्ञानाचा योग्य वापर आपण स्वत: करायला शिकू आणि आपल्याबरोबर ग्रामीण, वंचित घटकांमधील विद्यार्थ्यांनाही तंत्रज्ञानात पारंगत करण्यासाठी आपण धडपड करू, असं व्हायला हवं.

त्यांनी अजून एक आवाहन केलं होतं. **'मला काय मिळणार; पेक्षा मी काय देऊ शकतो'** याचा विचार प्रत्येकानं करायला हवा. या देशाला वैभव प्राप्त करून देण्यासाठी मी काय योगदान करू शकेन, असा विचार आत्तापासून तुम्हाला करता येईल का? छोट्या-मोठ्या कृतीतून तो व्य त करता येईल का? जमलं तर, त्यांचं पूर्ण भाषण मिळवून ऐका. सोप्या हिंदीत, उत्स्फूर्तपणे केलेलं भाषण खरंच आपण सर्वांनी समजून घ्यायला हवं अन् त्याप्रमाणे संकल्प व कृती करायला हवी.

थोड्या जास्त अपेक्षा करतोय का मी तुमच्याकडून? पण तुम्ही आता थोडे मोठे झाला आहात. मोठं होण्याची स्वप्ने पाहू शकता आहात; तेव्हा तुम्ही निदान असा विचार समजून घ्यायला सुरुवात करायलाच हवी. टप्प्याटप्प्यानं ते तुमच्या कृतीत येऊ लागतील. 'मी देशभ त नागरिक होणार', 'माझे माझ्या देशावर नितांत प्रेम आहे' असा भाव तर तुमच्या मनात आतापासून असायलाच हवा, हो ना...! मग जसजसे मोठ्ठे होत जाल, तसतसे त्यातला अर्थ समजून घेत, कृतीची जोड तुम्ही देऊ शकाल. तुमचा विचार मला कळवाल?

खूप साऱ्या शुभेच्छांसह...

**तुमचा दादा,**



**(महेन्द्र सेठिया)**



**शाळेचाच ध्यास, वाचन अभ्यास। ज्ञानाचा हव्यास, कौतुकाचा।।**



**अभिमानास्पद : खेलरत्न पुरस्कार - गीत सेठी -** बिलियर्ड्स (१९९२-९३)

**प्रायोजक - डॉ. कीर्ती आपटे, पुणे** - दात मजबूत राखण्यासाठी दातांची नियमित निगा राखा.

# चांदणी

– सरोज चौगुले

***प्राण्यांनाही माणसासारख्याच भावना असतात. आपल्या मालकाप्रतिचं त्यांचं प्रेम, इमान यांविषयी अनेक गोष्टी तुम्ही वाचल्या असतील. विशेषत: कुत्रा, मांजर, गाय, इ. ! पण या कथेतली 'चांदणी' आहे एक हरिणी– घरादारावर, अवघ्या गावावर प्रेम करणारी ! तिची ही कथा माणूस आणि जनावराच्या मैत्रीचं जगावेगळं प्रेम व्यक्त करणारी! म्हणूनच अंत:करणाला भिडणारी ...***



आमच्या गावात घडीव दगडांनी बांधलेला ब्राह्मणाचा चौसोपी वाडा होता. दाराच्या दोन्ही बाजूला मोठे लांब–रुंद सोपे होते. त्यात अलुते–बलुते व इतर गावातल्या माणसांना बसण्यासाठी, धान्याची पोती रचण्यासाठी, बैठकीसाठी असे स्वतंत्र सोपे होते. सोप्यात एका बाजूला लाकडी माच्याचा झोपाळा होता. पुढे अंगण व मागे परडं नसलं तरी सोप्यानंतर माजघर, झोपायच्या खोल्या, स्वयंपाकघर होतं. सोप्याच्या मध्यभागी ऐसपैस चौक होता. इतर घरांच्यामानानं वाडा भ  कम आणि रंगरंगोटी केलेला होता. आम्हाला त्या वाड्याचं कौतुक होतं ते मात्र, चांदणीसाठी !

चांदणी, एक अवखळ चंचल हरिणीचं पिल्लू होती. मळीच्या शेतात अगदी छोटं पिल्लू असताना मालकांना सापडली होती. कुठून कोण जाणे एकावर्षी हरणं आणि काळविटांचा कळप जंगल सोडून बाहेर आला होता म्हणे ! मळीची म  याची कणसं, ऊस, भाजीपाला, कुरणातलं गवत यावर ताव मारून पेरूच्या बागांतून मु  काम ठोकला होता त्यांनी. त्यांच्या आडव्या तिडव्या धावण्यानं पिकांचं नुकसान होऊ लागलं. म्हणून शेतकऱ्यांनी पिकांवर जाळ्या लावल्या. ते हरणांना कसं कळलं, कोण जाणे. ती हरणे धूमपसार झाली. पण हे छोटं पिलू मात्र जाळ्यात अडकून राहिलं. ते केविलवाणं ओरडू लागलं. मालकांनी त्याला पाहिलं. त्यांचा जीव कळवळला. त्यांनी ते पिल्लू जाळ्यातून सोडवून पोटाशी धरलं. मायेच्या उबेनं पिल्लू त्यांना अधिक चिकटलं, ते कायमचंच!

मालकांनी त्याला घरी आणलं. कापसाच्या बोळ्यानी दूध घातलं. पातळ पेज घातली. पोटच्या पोरीसारखी तिची देखभाल केली. जरा मोठी झाल्यावर त्यांनी च  क तिचं बारसं केलं. नाव ठेवलं चांदणी ! नदीला जाताना जरा लांबचा पडला, तरी त्या वाड्यावरून जाणारा रस्ताच आम्ही पसंत करत असू. पायात बांधलेल्या बारीक घुंगरांचा छुमछुम आवाज करत चौकात बागडणारी चांदणी पाहिली, की आम्हाला धन्य धन्य वाटे. उंच सोप्यावरून खाली आणि चौकातनं सोप्यात उंच उड्या मारत एखाद्या परकरी पोरीसारखी ती एकटीच खेळत राही.

एकदा पाहिलं की पाहातच राहावं, अशी देखणी होती चांदणी. चकचकीत फिकट तपकिरी रंग, त्यावर अजून स्पष्ट न उठलेले पांढरे ठिपके, सतत चाहुल घेण्यासाठी उभारलेले टोकदार कान, शिंगाच्या जागी किंचित काळसर–निळसर उंचवटे, लांबट नाजूक चेहरा, सतत ओलसर असणाऱ्या वास घेण्यासाठी नेहमी फुललेल्या नाकपुड्या, काहीतरी सारखं तोंडात चघळत असल्यानं सतत हालणारा जबडा आणि सगळ्यात मोठं आकर्षण म्हणजे तिचे काळेभोर टपोरे, नितळ डोळे. तिच्या निष्पाप





अभिमानास्पद : खेलरत्न पुरस्कार – कमांडर होमी डी. मोतीवाला – यॉटिंग (सांघिक) (१९९४–९५)

प्रायोजक - सौ. प्राची व श्री. शंतनू पटवर्धन, ह्यूस्टन, टे  सस, अमेरिका.

मनाचा स्वच्छ आरसाच जणू! चांदणीच्या लांब सडसडीत पायात बांधलेले छोटे घुंगरू गळ्यात बांधलेली पोवळ्यासारख्या भगव्या मण्यांची माळ आणि तिच्या मध्यभागी पदकासारखी एक छोटीशी नाजुक घंटा एवढंच तिला बंधन होतं. बाकी ती मु त, चंचल, स्वच्छंद संचार करायला मुखत्यार होती. मात्र, मालकांनी लावलेल्या सवयीमुळं वाड्याचं दार ओलांडून चांदणी कधी बाहेर येत नसे. त्यामुळं तिची झलक दिसावी म्हणून आमचा घोळका तासन् तास वाड्यासमोरच्या रस्त्यावर रेंगाळत राही.

चांदणी मालकांचा जीव की प्राण होती. चांदणीला कुत्र्या-मांजरांपासून जपताना सगळ्यांच्या नाकी नऊ यायचे. घरात अगदी मालकांच्या मांडीवर बसण्यापासून ते स्वायत्त राज्य असणाऱ्या आजीच्या देवघरापर्यंत तिला वावरण्याची मुभा होती. अशी ही चांदणी घरीदारी सर्वांची लाडकी होती.

दिवस, महिने, वर्ष, ऋतुमागून ऋतू पालटत गेले. बदलत्या ऋतुबरोबर चांदणीमध्येही झपाट्यानं बदल झाला. ती आता भरपूर उंच झाली. ताकदीनंही मजबूत झाली. डो यावर पिळापिळाच्या शिंगांचा मुकूट शोभू लागला. कान अधिक टोकदार, तीक्ष्ण झाले. अंगावरचे बुट्टे ठसठशीत, चमकदार पांढरे झाल्यामुळं चंदेरी बुट्ट्यांचा तपकिरी शालू नेसल्यासारखी दिसू लागली ती! लहानपणी चांदणीला धाक दाखविणारे मोती कुत्रा व भाटी, आता मात्र तिला घाबरत होते. मालकांच्या मांडीवर बसण्याइतकी ती आता लहान उरली नव्हती. तिच्यासाठी एक स्वतंत्र आसन बैठकीवर बनवण्यात आलं होतं. तिथं ऐटीत बसून चांदणी रुबाबात बैठकीतल्या साऱ्या घडोमोडींवर देखरेख करायची!

मालकांचं शेत शंभर सव्वाशे एकर होतं. सगळी शेती खंडानं रयतांना कसण्यासाठी दिली होती. चैत्र पाडव्याला सगळे रयत खंड भरायला येत असत. असेच एकदा





गुरू आमुचे दक्ष, जाणते, ज्ञानदान करण्यासाठी । उदार आणि तत्पर, त्यांची वर्णावी महती मोठी।।



अभिमानास्पद : खेलरत्न पुरस्कार - लेफ्टनंट कमांडर पी के गर्ग - यॉटिंग (सांघिक) (१९९४-९५)

प्रायोजक - डॉ. गीतांजली व डॉ. सिद्धार्थ पटवर्धन, ग्लासगो, स्कॉटलंड (U.K.)

रयत खंड भरायला आले होते. त्या काळात व्यवहारात नोटा नव्हत्या. त्यामुळं हिशोबानुसार चांदीची नाणी भरून थैल्या आणल्या होत्या सर्वांनी! नाण्यांच्या पारखीसाठी एक दगड होता. त्यावर प्रत्येक नाणं आपटलं जाई. 'छन्न' आवाज आला तर नाणं खरं. 'बद्द' आवाज आला तर खोटं. अशी परीक्षा करून नाणी घेतली जात होती. कारकून सगळ्या व्यवहाराची नोंद करत होता. येणं-देणं लिहून ठेवत होता. कारभारी त्या अनुसार बांधून दुसऱ्या एका पोत्यात थैल्या एकत्र करत होता... अचानक चांदणीनं मान वर केली आणि डोळ्याचं पातं लवतं न लवतं एवढ्या वेळात बैठकीवरनं तिनं खाली चौकात एका झेपेतच उडी घेतली, ती नेमकी कारभाऱ्याच्या हातावर! त्या पूर्ण वाढीच्या हरिणाच्या वजनानं कारभारी होळपटला. आणि पोत्याच्या आडोशानं त्यानं लपवलेली पिशवी पुढे आली. चांदणीनं पिशवी तोंडात पकडली आणि मालकापुढं धरली. मालकांनी आश्चर्यानं, कुतूहलानं पिशवी घेतली. उघडून पाहिली. पिशवीत नाण्यांनी भरलेल्या तीन थैल्या होत्या. प्रत्येक थैलीत शंभर शंभर चांदीची नाणी होती. कारभाऱ्यानं सर्वांची नजर चुकवून त्या थैल्या बाजूला काढल्या होत्या; पण चांदणीच्या चौकस नजरेतून ही गोष्ट सुटली नव्हती!

चांदणीच्या चाणाक्षपणानं कारभाऱ्याची चोरी सर्वांसमोर उघडी पडली होती. त्यांचं तोंड काळं ठि कर पडलं होतं. कारकुनालाही घाम फुटला होता. संतापानं मालकांनी कारकुनाच्या हातातली वही खस्सदिशी ओढून घेतली. हिशोबाच्या नोंदीवर सूक्ष्मपणे नजर टाकली. कारकुनानं 'त्या' तीन थैल्यांची नोंदच केलेली नव्हती. म्हणजे दोघांच्या संगनमतानं ही चोरी दिवसाढवळ्या सगळ्यांच्या साक्षीनं चालली होती. हे सूर्यप्रकाशाइतकं स्वच्छ होतं. मालकांच्या रागाचा पारा भयंकर चढला. त्यानी दोघांची चांगलीच खरडपट्टी काढली.

मालकाच्या कडाडण्यानं सगळा वाडा थरारला! कारभारी आणि कारकून यांनी खालमानेनं काढता पाय घेतला. पण ज्यांनी खंड देऊनसुद्धा खंड नोंदला गेला नव्हता; त्यांच्या खंडाची चांदणीमुळं नोंद झाली होती. त्यामुळं ते लोक चांदणीवर बेहद्द खूष झाले. शेतकऱ्यांच्या खंडाची थकबाकी का राहात होती, त्याचं गौडबंगाल आता उलगडलं. त्यामुळे सगळ्या रयतांनी चांदणीच्या नावानं चांगभलंऽ चा गजर केला. सर्वांनी खूष होऊन एकेक नाणं बक्षीस म्हणून चांदणीला दिलं. चांदणी सुमारे पंचवीस चांदीच्या नाण्यांची मालकीण झाली. मालकांनी त्यात स्वत:च्या पंचवीस नाण्यांची भर घातली. चांदणीच्या पायात चांदीचे वाळे, तोडे घातले. गळ्यात घुंगऱ्यांची रुमझुमणारी माळ घातली. चांदणी त्यांचा नाद घुमवत घरभर आनंदानं फिरू लागली. साऱ्या गावाची जणू गळ्यातली ताईत झाली!

पण चांदणीची ही लोकप्रियता न पाहवणारी दोन माणसं मात्र, तिला पाण्यात पाहात. चांदणीवर सर्वांची माया असल्यामुळं, गडी माणसं, मालक, मालकीणबाई साऱ्यांची दक्ष नजर असल्यामुळं त्यांना काहीच हालचाल करता येत नव्हती. पण काही झालं तरी, चांदणीचा काटा काढायचाच असा निश्चय करून, ते योग्य संधीची वाट पाहात होते. एक दिवस कारभारी आणि कारकून पश्चात्ताप झाल्याचं, नाटक करत वाड्यावर गेले. मालकीणबाईंसमोर, आजीसमोर रडून, त्यांच्या पाया पडून दोघांनी माफी मागितली. ते गेले; पण जाताना चांदणीच्या चाऱ्यात विषारी वनस्पतींची पानं त्यांनी मिसळून टाकली. चांदणीनं नेहमीप्रमाणे चारा खाल्ला आणि बघता बघता तिच्या तोंडाला फेस आला. ती हातपाय झाडू लागली. तिची अवस्था बघून मालकीणबाई, आजी, गडी माणसं साऱ्यांची पाचावर धारण बसली. मालकांना तातडीनं शेतावर निरोप धाडला. ही वार्ता ऐकताच त्यांची कंबर खचली; पण आधी चांदणीला वाचवणं महत्त्वाचं होतं. त्यामुळे येतानाच ते शंकरकाका या औषधी



**शाळा आणि पाऊस एकदम होती सुरू। दोन्ही माझे मित्र आहेत, दोन्ही माझे गुरू।।**

**अभिमानास्पद : खेलरत्न पुरस्कार - कर्नम मल्लेश्वरी -** वजने उलचण्याचा व्यायामप्रकार (वेट लिफ्टिंग) (१९९५-९६)



**प्रायोजक - सौ. मंजुषा सावर्डेकर, पुणे.**



वनस्पती जाणणाऱ्या आजोबांना घेऊन फटफटीवरनं वाऱ्याच्या वेगानं आले. आजी चांदणीचं पोट चोळत होत्या. मालक येताच सगळे बाजूला झाले. मालकांनी चांदणीच्या तोंडावरून हात फिरवला. तिनं हलकेच पापण्या उचलून त्यांच्याकडं पाहिलं आणि ती आचके देऊ लागली. शंकरकाकांनी विषावर उतारा म्हणून आणलेला दुसरा औषधी पाल्याचा रस मोठ्या मिनतवारीनं चांदणीला दिला. क्षणभरात प्रचंड उलटी होऊन चांदणीचं पोट रिकामं झालं. ती शांत होऊन निपचित पडली. तिची तडफड कमी झाली. चांदणी नव्हे, पोटची पोरच हाती लागली असा आनंद मालकांना झाला!

आता त्यांनी सगळ्यांना चांगलं फैलावर घेतलं. डोळ्यांत तेल घालून चांदणीची राखण करून हे कसं घडलं? घरी कोण–कोण आलं होतं? काय–काय झालं? अशा प्रश्नांच्या फैरी झडल्या. जेव्हा सगळा वृत्तांत त्यांना कळला; तेव्हा कारभारी आणि कारकून यांना खाऊ की गिळू असं मालकांना झालं होतं. पण त्यांनी मनावर ताबा ठेवून पोलिसात फिर्याद दिली. गावात पोलीस आलेले बघताच कारभारी आणि कारकून पळून जाण्याचा प्रयत्न करू लागले. कोर्टात साऱ्या गावानंच त्यांच्या विरुद्ध साक्ष दिली. पैशाचा पण त्यांनी अपहार केला होता. मालकांची फसवणूक केल्याचा आरोप शेवटी दोघांनी मान्य केला. त्यांना दोन वर्षांची कारावासाची शिक्षा झाली.

त्यानंतर काही दिवसांनी चांदणी पूर्ण बरी झाली; पण तिला आता घरात कोंडून ठेवणं मुष्किल होऊ लागलं. रानात नेऊन सोडावं तर



वाढते विश्वास, वाढते जिज्ञासा। ज्ञानाने श्वासाला, मिळतो दिलासा।।



**अभिमानास्पद : खेलरत्न पुरस्कार – कुंजुरानी –** वजने उलचण्याचा व्यायामप्रकार (वेट लिफ्टिंग) (१९९६–९७)

**प्रायोजक – श्री. सुधीर विष्णू दफ्तरदार, पुणे.**

हिंस्र श्वापदांच्या भक्ष्यस्थानी पडण्याची भीती होती. वाड्याच्या आवारात ठेवावं तर ते तिला अपुरं पडणार होतं. शेतात जागा करून नेऊन ठेवावं, तरी राखण कमी पडणार होती. काय करावं? कसं करावं? मालक विचारात पडले. चौकशीअंती सुदैवानं कोल्हापूरच्या प्राणीसंग्रहालयात हरिणीची सोय होईल, असं मालकांना कळलं. मालकांनी प्रत्यक्ष जाऊन-भेटून चांदणीची व्यवस्था नीट होईल, याची खात्री करून घेतली. आणि मन घट्ट करून चांदणीला कोल्हापूरला पाठवायचं मालकांनी ठरवलं. घरातल्या, गावातल्या लोकांना खूप वाईट वाटलं. त्यांनी चांदणीला पाठवू नका म्हणून मालकांची मनधरणी केली. पण काहीच उपयोग नव्हता.

''हे बघा, मुलगी कितीही लाडाची असली, तरी तिला नवऱ्याच्या घरी पाठवावंच लागतं ना? तसंच चांदणीचा जोडीदारही तिची वाट पाहतोय कोल्हापुरात. तिथं ती अधिक सुखरूप, सुरक्षित राहील, समजलं?'' मालकांनी सगळ्यांची समजूत घातली. सगळ्यांचा निरुपायच झाला. चांदणीचा निरोप घेण्याशिवाय पर्याय नव्हता


सर्व गाव चांदणीच्या पाठवणीसाठी जमा झाला होता. मालकीणबाईंनी चांदणीच्या पाठवणीची अगदी जय्यत तयारी केली होती. घरातल्या आजीपासून ती मालकांची नात जयवंतीपर्यंत सर्वांनाच चांदणी जायला नको होती. पण जे चाललं होतं ते, चांदणीच्या भल्यासाठीच होतं.

''चांदणी, चल बेटा, लांब जायचंय आपल्याला. ये बस गाडीत,'' असं मालकांनी म्हणता क्षणाचाही विलंब न लावता चांदणी उडी मारून गाडीत बसली. चांदणीसाठी लोकांनी दिलेल्या वस्तूंनी प्राणी संग्रहालयाची जीप भरली होती. तीही गाडी पाठोपाठ निघाली.

अनेक मुखातून 'चांदणी जपून राहा. संभाळून राहा,' असे शब्द उमटले. निरोपासाठी अनेक हात हालत राहिले. चांदणी मान उंचावून वळून पाहात होती. तिचे टपोरे डोळेही पाणावले होते. मालकांचा हात मूकपणे तिच्या तोंडावरून फिरत होता. प्राणी-संग्रहालयातून चांदणीला आणण्यासाठी आलेले लोक दिङ्मूढ होऊन ही अजब पाठवणी पाहात होते. माणूस आणि जनावरांच्या मैत्रीचं, मोठं जगावेगळं रूप त्यांच्या दृष्टीला दीपवत होतं.

✱✱

**- सरोज चौगुले**
प्लॉट नं. ५७, 'धनसरोज',
रत्नाप्पा कुंभारनगर - २,
कोल्हापूर 416013



## गीताचा भावार्थ

**मलपृष्ठाच्या आतील पानावरील पद्य - अमे गीत गगनतां गाशुं** (गुजराथी गीत)

आम्ही आकाशाचे गीत गाऊ, आम्ही मग्न होऊन गीत गाऊ. किणकिण निनाद करणाऱ्या या स्वरांना ऐकून तुम्ही विचारणार - 'अरे हे काय आहे?' सूर्य, चंद्र अस्ताला गेले आहेत. नवलाख तारे चमकायला लागले आहेत. हातावर पडणाऱ्या जलधारांना थांबवून घ्या. आम्ही सुरांच्या सरितेत न्हाऊन निघू. बघा, सर्व पक्षी रात्रंदिवस किलबिलाट करत आहेत.

सकाळ-संध्याकाळ कोकीळ, बुलबुल मंगल सुरात गात आहेत, म्हणून रात्र विभोर झाली आहे. आम्ही सर्व थकव्याला विसरून आकाशाचे गीत गाऊ. रात्री पक्षी जणूकाही मुनींसारखे ध्यानस्थ झाले आहेत. झऱ्यांनीसुद्धा मौनव्रत घेतले आहे. अशा या नीरव वातावरणात प्रत्येकाच्या हृदयात प्रभुप्रति भ ती निर्माण होऊ द्या.

आम्ही दिलखुलास आकाशाचे गीत गाऊ. प्रचंड माणसांच्या गोंधळात, कलकलाटात या ब्रह्मनादाचा आवाज पसरू द्या. रात्रीच्या अंधारात जेव्हा सर्व जग झोपते तेव्हा मधुर वीणेचा झंकार करूया. अमर स्वरांच्या या गूढ निनादाचा अर्थ जाणून घेऊया.



अनुभव सार शोषुन घेऊ, धुंदि साहसामधली चाखू। पाय ठेवुनी जमिनीवरती झेपच घेऊ ।।

**अभिमानास्पद : खेलरत्न पुरस्कार - लिएंडर पेस -** टेनिस (१९९६-९७)

**प्रायोजक - श्री. नचिकेत खरे, पुणे.**

# जिद्द

भूक लागते - मरून जाते - पुन्हा लागते भूक
असे भुकेने व्याकुळ होणे, नाही तुला ठाऊक.

‘शाळेचा कंटाळा येतो;’ नको म्हणू तू मित्रा,
‘मला हवी शाळा’ मी म्हणतो, उभी संकटं सतरा.

शाळेची बस घेऊन जाते, तुला आणते घरी,
माझी वणवण संपत नाही, दिवस संपतो तरी.

थंडीत स्वेटर, पावसात छत्री, उन्हाळ्यामध्ये पंखा,
सुखे सर्व ही तुझ्याचसाठी, मला न पाठीराखा.

कधी खेळ मी नाही खेळलो, नाही हसलो-रुसलो,
आई-बाबा भावंडांच्या प्रेमालाही मुकलो.

शाळेचा गणवेश इस्त्रीचा, दप्तर पाठीवरती,
पायांमध्ये बूट नि मोजे, मजा तुझी रे किती.

मळकट माझा वेश एक हा, भिजलेला घामाने,
अनवाणी पायांना चटके, झुकलेलो ओझ्याने.

राहायला घर, झोपायला तुला गादी अन् उशी,
आकाशाच्या छताखाली मी, गाठोडं डो  याशी.

तरीही म्हणतो, ‘शाळेत जाईन, करीन मी अभ्यास,
कंटाळा तू करू नको, ही शाळा असते खास.’

शाळेमध्ये शिकून मित्रा, खूप-खूप हो मोठा,
जुनी पुस्तकं तुझी मला दे, रात्रशाळेकरिता.





**– डॉ. सुमन नवलकर**
ए/२० ज्योती बिल्डिंग, प्लॉट नं. ४३/४५,
बरकत अली दर्गा मार्ग, वडाळा (पूर्व) मुंबई 400037



माझ्या या ओंजळीत गुरूचा प्रसाद । घुमतो मनात ज्ञानाचा निनाद...।।



अभिमानास्पद : खेलरत्न पुरस्कार – सचिन तेंडुलकर – क्रिकेट (१९९७–९८)

प्रायोजक - श्री. संदीप जगधने, पुणे.

**संस्था परिचय**

# भांडारकर प्राच्यविद्या संशोधन मंदिर, पुणे

**– श्रीनंद बापट**



प्राचीन साहित्य, अभिलेख, नाणी, कला, शिल्प, धर्म, तत्त्वज्ञान, विज्ञान, यांचा अभ्यास करण्याची आणि त्यातून आपली संस्कृती समजावून घेण्याची एक नवीन शास्त्रीय पद्धती सुमारे दोनशे वर्षांपूर्वी युरोपमध्ये निर्माण होऊ लागली. विविध देशांच्या संस्कृतीचा अभ्यास या पद्धतीप्रमाणे सुरू झाला. त्यात भारताविषयीच्या अभ्यासाचाही समावेश होता. त्यावेळी भारतावर राज्य करीत असणाऱ्या ब्रिटिशांनी त्याकरिता विविध संस्था स्थापन केल्या, विद्यापीठे उघडली. मात्र, एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीपर्यंत भारतीय लोकांनी या कारणासाठी संस्था स्थापन केल्या नव्हत्या. 'भांडारकर प्राच्यविद्या संशोधन मंदिर' ही भारतीय लोकांनी स्थापन केलेली त्या प्रकारची पहिली संस्था होय.

ही संस्था ज्यांच्या नावाने स्थापन झाली ते 'सर रामकृष्ण गोपाळ भांडारकर' यांचा जन्म इ. स. १८३७ सालचा. मुंबई विद्यापीठाच्या अगदी सुरुवातीच्या पिढीतील ते विद्यार्थी. विद्यापीठातून पदवी प्राप्त केल्यावर त्यांनी अध्यापक म्हणून काम केले. शिक्षणखात्यात प्रशासकीय नोकरीही केली. त्यानंतर मुंबईच्या एलफिन्स्टन आणि पुण्याच्या डे कन कॉलेजमध्ये ते प्राध्यापक होते. मुंबई विद्यापीठाचे दुसरे भारतीय कुलगुरू म्हणून ते निवृत्त झाले. समाजसुधारणेचे कामही त्यांनी हाती घेतले होते, हे आपल्याला माहीत आहेच. भांडारकरांचा विविध विषयांचा व्यासंग होता. या लेखाच्या प्रारंभी दिलेल्या भारतीय संस्कृतीच्या जवळजवळ सर्व अंगांविषयी भांडारकरांनी मौलिक स्वरूपाचे संशोधन आणि लेखन केलेले आहे. त्यांचा विद्यार्थीवर्गही फार मोठा आणि कर्तृत्ववान होता. भांडारकर हे दीर्घायुषी होते. त्यांच्या ऐंशीव्या वाढदिवशी, म्हणजे ६ जुलै इ. स. १९१७ या दिवशी भांडारकर संस्थेची स्थापना त्यांच्या विद्यार्थ्यांनी आणि चाहत्यांनी केली.

स्थापनेच्या दिवशीच भांडारकरांनी स्वत:चा २,२०० पुस्तकांचा मौल्यवान संग्रह संस्थेला भेट दिला आणि संस्थेच्या ग्रंथालयाची सुरुवात झाली. सातारा जिल्ह्यातील औंधचे संस्थानिक 'भवानराव पंतप्रतिनिधी' यांनी मांडलेल्या कल्पनेनुसार संस्थेने आपला पहिला प्रकल्प हाती घेतला. महाभारत या महाग्रंथाच्या संशोधित आवृत्तीचा तो प्रकल्प होता. महाभारताची सर्वात लहान पोथी सुमारे साठ हजार श्लोकांची, तर तेच कथानक सांगणारी मोठी पोथी सुमारे दीड लाख श्लोकांची आहे. काही ठिकाणी कथानकामध्ये लहानमोठे फरक आहेत आणि जवळजवळ प्रत्येक श्लोकातील शब्दांमध्ये, विविध आवृत्त्यांमध्ये काही ना काही फरक आहे. तसेच भारताबाहेर इंडोनेशिया, थायलंड, कंबोडिया यांसारख्या देशांमधल्या महाभारताच्या कथेचाही अभ्यास चालू होता. त्या सगळ्या कथांचा संग्रह करून अशी नवी आवृत्ती तयार करणे महाभारताच्या समग्र अभ्यासाच्या दृष्टीने आवश्यक होते. हे करण्याकरिता संस्थेने जगभरातून महाभारताच्या सुमारे सोळाशे पोथ्या गोळा केल्या. त्यापैकी ७३४ निवडक पोथ्यांमधून महाभारताची एकोणीस खंडांची प्रचंड आवृत्ती तयार झाली. अठ्ठेचाळीस वर्षांच्या प्रदीर्घ परिश्रमानंतर ही आवृत्ती १९६६ साली पूर्ण झाली. भारताचे तत्कालिन राष्ट्रपती डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन् यांच्या हस्ते ही आवृत्ती प्रकाशित करण्यात आली.

महाभारतातील विविध विषयांची सूची तयार करण्याचे काम त्यानंतर हाती घेण्यात आले. महाभारतामध्ये सांगितलेले पर्वत, नद्या, देश, नगरे, गावे, प्राणी, पक्षी, वनस्पती, व्य ती, वस्तू इत्यादी गोष्टींची सूची तयार करण्याचे ते काम आहे. महाभारताच्या या सांस्कृतिक सूचीचे दोन खंड प्रकाशित झाले व हे काम आजही सुरू आहे.



आधीपासुनी सर्व करता तयारी, न भीती, नको ताण वर्षाअखेरी । असे ज्ञान सर्वांमध्ये श्रेष्ठ बाळा, सदा पेटवावी तयाचीच ज्वाला ।।

अभिमानास्पद : खेलरत्न पुरस्कार – ज्योतिर्मयी सिकंदर – ॲथलेटि स (१९९८–९९)

प्रायोजक – सौ. गीतांजली हेमंत जोशी, वाशी, नवी मुंबई.

महाभारताच्या विभागाबरोबरच संस्थेने आपला प्रकाशन विभागही सुरू केला. *'ॲनल्स ऑफ द भांडारकर ओरिएंटल रिसर्च इन्स्टिट्यूट'* हे संशोधन-नियतकालिक सुरू केले. या नियतकालिकात अत्यंत श्रेष्ठ दर्जाचे संशोधन लेख प्रकाशित झालेले असून, त्याच्या त्र्याण्णवव्या खंडाचे काम सध्या सुरू आहे. ॲनल्सबरोबरच संस्थेने इतरही अनेक संशोधन ग्रंथ प्रकाशित केले. त्यांची संख्या सुमारे चारशे इतकी भरते.

डॉ. पांडुरंग वामन काणे यांनी लिहिलेला 'हिंदू धर्मशास्त्राचा इतिहास' हे संस्थेचे एक अत्यंत महत्त्वाचे प्रकाशन आहे. काणे यांच्या सुमारे सदतीस वर्षांच्या अथक परिश्रमांतून साकार झालेला हा ग्रंथ पाच खंडांचा, सुमारे ६२०० पानांचा असून 'धर्मशास्त्र' या विषयावर अतिशय तटस्थपणे लिहिलेला ग्रंथ म्हणून तो जगभर अभ्यासला जातो. १९६४ साली या ग्रंथासाठी डॉ. काणे यांना 'भारतरत्न' हा देशातला सर्वोच्च नागरी सन्मान बहाल करण्यात आला. एखाद्या ग्रंथाच्या लेखनाकरिता 'भारतरत्न' बहाल करण्यात आलेले डॉ. काणे हे एकमेव व्य ती आहेत.

दीर्घकाळपर्यंत संस्थेचे मानद सचिव म्हणून कार्यरत राहिलेल्या डॉ. रामचंद्र नारायण दांडेकर यांनी *'वेदिक बिब्लिओग्राफ़ी'* या अशाच एका मोठ्या ग्रंथमालिकेची रचना केली. वेदांचा अभ्यास जगभरात अनेक देशांमध्ये होतो. या अभ्यासाची वर्णनात्मक सूची म्हणजे ही *बिब्लिओग्राफी* होय. तिच्यात सुमारे साठ हजार ग्रंथ आणि लेखांच्या नोंदी समाविष्ट असून, सध्या तिच्या सातव्या खंडाचे काम सुरू आहे.

प्राकृत भाषा हा भारतीय संस्कृतीचा एक मोठा ठेवा आहे. मगधातील मागधी, मथुरेजवळची शौरसेनी, अपभ्रंश, महाराष्ट्रातील माहाराष्ट्री, पैशाची अशा त्या भाषा होत. भारतातील फार मोठ्या भूभागावर या भाषा हजारो वर्षे बोलल्या जात होत्या. तसेच त्यांच्यात साहित्याची रचनाही होत होती. आजच्या प्रादेशिक भाषा या प्राकृत भाषांमधूनच उत्पन्न झालेल्या आहेत. या भाषांमधील निवडक पाचशे ग्रंथांमधील प्रत्येक शब्दाचा अर्थ देणारा शब्दकोश संस्था सध्या तयार करीत आहे. हा शब्दकोश पूर्ण होईल, तेव्हा त्यात सुमारे दहा लाख शब्दांचे अर्थ दिलेले असतील. या कोशाचे पाच खंड प्रकाशित झालेले आहेत. 'अ' ते 'औ' या स्वरांनी सुरू होणाऱ्या शब्दांचे अर्थ देण्याचे काम पूर्ण झालेले असून सध्या 'क' या अक्षराने सुरू होणाऱ्या शब्दांचे काम सुरू आहे.

संस्थेच्या ग्रंथालयाचा शुभारंभ भांडारकरांनी भेट दिलेल्या ग्रंथांनी झाला हे आपण पाहिले. या ग्रंथालयात सध्या १,३०,००० पुस्तके आणि नियतकालिके असून संशोधन क्षेत्रात अत्यंत महत्वाचे ग्रंथालय असा त्याचा लौकिक आहे. जगभरातील अभ्यासक त्याचा लाभ घेतात.

त्याचबरोबर संस्थेकडे सुमारे अठ्ठावीस हजार हस्तलिखित पोथ्यांचा संग्रह आहे. इ. स. १८६६ ते १९१५ या काळात तत्कालिन मुंबई प्रांताच्या सरकारच्या योजनेतून गोळा केलेल्या सुमारे सतरा हजार पोथ्या भांडारकर संस्थेला १९२२ साली देण्यात आल्या. या पोथ्यांमध्ये संस्थेने सुमारे अकरा हजार पोथ्यांची भर घातली. काश्मीरमधून गोळा केलेल्या आठशेहून अधिक पोथ्या हे या संग्रहाचे वैशिष्ट्य आहे. या संग्रहातील ऋग्वेदाच्या पोथीची नोंद युनेस्कोच्या *'वर्ल्ड हेरिटेज रजिस्टर'* मध्ये घेण्यात आलेली आहे, तर पाच हस्तलिखितांना 'राष्ट्रीय महत्त्वाची हस्तलिखिते' म्हणून मान्यता मिळालेली आहे. भारत सरकारच्या राष्ट्रीय पाण्डुलिपि मिशन (National Mission for Manuscripts) या अभियानाचे महाराष्ट्र राज्यासाठीचे केंद्र भांडारकर संस्थेमध्ये असून हस्तलिखितांच्या नोंदणीचे आणि शास्त्रीय पद्धतीने जतनाचे काम या केंद्रामध्ये चालते.

आजकाल जरी सभा, परिषदा आणि संमेलने ही मोठ्या प्रमाणावर होत असली, तरी शंभर वर्षांपूर्वी अशी स्थिती नव्हती. आपले संशोधन लोकांपुढे मांडायला अभ्यासकांना व्यासपीठ उपलब्ध नव्हते. भांडारकर संस्थेने त्याकरिता 'अखिल भारतीय प्राच्यविद्या परिषदे'ची स्थापना केली. या परिषदेची अधिवेशने देशभरात होत असतात. अशाप्रकारे विविध अंगांनी कार्यरत असणारी ही संस्था आणखी दोन वर्षांनी शताब्दी वर्षामध्ये पदार्पण करणार आहे.

**– श्रीनंद बापट**

भांडारकर प्राच्यविद्या संस्था,
विधी महाविद्यालय रस्ता, पुणे - ४

प्रभाते मनी आस पाठांतराची। उजळणी करावी तथा उत्तरांची।।



अभिमानास्पद : खेलरत्न पुरस्कार - धनराज पिल्ले - हॉकी (१९९९-२०००)
प्रायोजक - श्री. क्षेत्रपालेश्वर टुरिस्ट, पुणे, ☎ ०२०- २४४५०९७५

# 'स्मार्ट' आहे मी !

**– सुनीला गोंधळेकर**



***'स्मार्ट' दिसणारी, वागणारी माणसं, आपले मित्र–मैत्रिणी आपलं लक्ष नेहमीच वेधून घेतात. काही वेळा 'आपण का बरं असे नाही?' असा न्यूनगंड मग आपल्याही मनात निर्माण होतो. पण 'खरा स्मार्टनेस' कोणता ? याविषयी विविध उदाहरणांच्या साहाय्याने काही निश्चित विचार सुनीलाताई गोंधळेकर तुमच्यासमोर ठेवतायत. त्यातून अंतर्मुख होऊन प्रामाणिकपणे स्वत:चाच स्वत: शोध घ्या आणि 'खरेखुरे स्मार्ट' बना !***

'वा! मस्त, **स्मार्ट** आहेस हं एकदम !' किंवा 'काय *स्मार्ट* दिसतोयंस तू !' हे वा य ऐकायला कुठल्या मुलीला किंवा मुलाला आवडणार नाही? *स्मार्ट* म्हटलं, की कसं एकदम मस्त वाटतं. आपला भाव एकदम वधारल्यासारखा वाटतो... हो नं?

'हातात मोबाईल फोन, ओठांवर फाडफाड इंग्रजी, घरी *इंटरनेटवर* काय–काय पाहिलं याची मित्र–मैत्रिणींशी चर्चा, *फेसबुक अकाउन्ट,* त्यावर ताजे–ताजे टाकलेले फोटो, अंगात *ब्रॅन्डेड* जीन्स आणि पाठीवर सॅक. ओ ! व्वाह ! किती *स्मार्ट* आहेत ही मुलं.' आजूबाजूची अशी आधुनिक, *पॉश* मुलंमुली पाहिली की सुरेखाच्या मनात यायचं, 'कशी मी अगदी बावळट आहे. आमच्या घरी साधा संगणक नाही, *फेसबुकचं* तोंड कधी पाहिलेलं नाही. प्रकल्पासाठी *'गुगल'* शोधलेलं नाही. मी अगदीच 'अशीतशी' आहे. मी काही इतरांसारखी *'स्मार्ट'* नाही...'

तुम्हालासुद्धा सुरेखा सारखं असंच काहीतरी वाटतं का ? मग जरा थांबा – थोडा विचार करा. *स्मार्टनेस* म्हणजे न की काय? हे आपण थोडे तपासून पाहू या. बघा, माझ्या मित्रमैत्रिणींचे पुढे दिलेले अनुभव वाचून तुम्हाला काय वाटतं, ते तुमचं तुम्हीच ठरवा...

*आजीला बरं वाटत नव्हतं. आईला कामाची घाई होती. बाबा तर कामानिमित्त बाहेरगावी गेला होता. अचानक पाणी प्यायला उठलेल्या, आजीचा तोल गेला. आई पर्स टाकून धावत आली. तिनं आजीला उठवलं; पण आजीची शुद्ध गेली होती. आईला आजीजवळ थांबायलाच हवं होतं. साक्षीनं पटकन शेजारच्या घरी जाऊन काकांना बोलावलं. डिरेक्टरीतून डॉक्टरांचा फोन नं. शोधून त्यांना फोन केला. परिस्थिती अगदी संयतपणे हाताळली.*

***

*त्या दिवशी क्लास संपवून घरी जायला उशीरच झाला. तिघीजणी मिळून घरी निघाल्या. बऱ्यापैकी अंधार पडला होता. कोपऱ्यावर तीन–चार मुलांचा घोळका उभा होता. नमिता, सई घाबरल्या. मुलं रस्त्याच्या मधे येऊन रस्ता अडवून उभी राहिली. त्या मुलींना काय करावं हे सुचेना. अशावेळी आकांक्षा पुढे झाली. आणि जोरात म्हणाली, ''चल गं सई, आपण या पलीकडच्या बोळातून जाऊ. इथेच काका राहतात माझे. त्यांना हाक मारते. आणि दादापण असेलच आत्ता घरी.'' तिनं जोरात हाक मारली, तसे शेजारच्या घरातले काका बाहेर आले. एक आजीपण आल्या. हे पाहाताच मुलांचा घोळका बाजूला सरकला. मुलांशी एक शब्दही न बोलता, धीर दाखवून प्रसंगावधान बाळगणारी आकांक्षा स्मार्टच नव्हे काय?*

***

*आज शाळेत पाहुणे येणार होते. छोट्या गावातल्या शाळेत शहरातून पाहुणे येणार म्हणजे अप्रूपच! शाळेनं जय्यत तयारी केली होती.*



प्रमेये, गणिते, कृती आणि पाढे। तयाने तुझा आत्मविश्वास वाढे ।।

अभिमानास्पद : खेलरत्न पुरस्कार – पी गोपीचंद – बॅडमिंटन (२०००–०१)

प्रायोजक -डॉ. संदीप श्रोत्री, सातारा.

बक्षीस समारंभाची उत्सुकता सगळ्यांनाच होती. गाण्याच्या मुली ओळीत उभ्या होत्या आणि माननीय पाहुणे आले. त्यांची ओळख झाली. मग मुलं वाट पाहत असलेला बक्षीस समारंभ झाला. प्रत्येकाला प्रशस्तिपत्रक आणि पेढ्याची पुडी मिळाली.

नंतर पाहुण्यांचं भाषण सुरू झालं. गावातलं एक कुत्रं अचानक मैदानात शिरलं. मुलांच्या रांगेत घुसलं. मुलं घाबरली, ओरडायला-पळायला लागली. सगळीकडे गोंधळ उडाला. एवढ्या सुंदर कार्यक्रमाचा जणू रसभंग झाला. पुढे उभे असलेल्या शिक्षकांना काय झालं ते कळेना. समीर पटकन पुढे झाला. त्यानं मिळालेला पेढा कुत्र्याला दाखवला. पेढ्याची उघडी पुडी घेऊन पळत-पळत मैदानाबाहेर गेला. मागोमाग कुत्रंही पळालं. पुढचा कार्यक्रम नीट पार पडला. स्मार्ट समीर आणि त्याचे स्मार्ट प्रसंगावधान इथे उपयोगी पडले.

***

आज शाळेतला शेवटचा तास खेळाचा. तो तास घेण्याची जबाबदारी होती निखिलच्या गटाची. ५ मि.चे दहा वेगवेगळे खेळ घेण्याची तयारी निखिलनं कालच केली होती. त्यासाठी लागणारं सामान असलेली पिशवी आकाशला आणायला सांगितली. नेमकी ती पिशवी आकाश घरी विसरला. तास सुरू झाल्यावर ही गोष्ट त्याच्या लक्षात आली. इतक्या आयत्या वेळेला काय करायचं? निखिल गटप्रमुख. त्याच्या कानावर तर हे घालायलाच हवं. आता निखिल चिडणार, ओरडणार, सगळ्यांसमोर आपला पचका होणार म्हणून आकाश रडवेला झाला. आणि घाबरत घाबरत निखिलला त्यानं पिशवी घरी





विज्ञानाच्या शिखरावरती प्रगतीच्या वहिवाटा। आधुनिकतेच्या नव्या नवेल्या साद घालती लाटा...।



अभिमानास्पद : खेलरत्न पुरस्कार - अभिनव बिंद्रा - तिरंदाजी (२००१-०२)

प्रायोजक - प्रतिभा इलेक्ट्रिकल्स, पुणे.

*विसरल्याचं सांगितलं. पण निखिल खरा स्मार्ट गटप्रमुख! तो चिडला नाही. ओरडला तर मुळीच नाही. त्यानं आकाशलाच विचारलं. ‘‘आकाश, पटकन विचार कर, शाळेत, मैदानावर अश्या कोणत्या वस्तू आहेत ज्या वापरून खेळ घेता येतील? आपण खेळ आणि वस्तू बदलू शकतो.’’ मग आकाशला हुरूप आला. त्यानंही विचार करायला सुरवात केली. मग खडूचे तुकडे, मैदानात पडलेल्या विटा, यातून त्याला दोन खेळ सुचले. तिसऱ्या खेळासाठी त्यांनी काही मुलांना ओणवे उभे करून अडथळ्यांची शर्यत घेतली. आणि शेवटी आयत्यावेळचा खेळ म्हणून स्मरणशक्तीचा खेळ घेतला. त्याला कोणतंही साहित्य लागलं नाही. आकाशचं साहित्य घरीच राहिलं आहे त्याचा वर्गात कोणालाही पत्ता लागला नाही.*

***

*अमेयचे बाबा त्या चौघांना घेऊन जायला गाडी घेऊन आले होते. आज साहस शिबिराची सुरुवात होणार होती. छोट्याशा गावात जाऊन साहस खेळ करायचे म्हणून चौघेजण अपर्णा, अश्विनी, केदार आणि अमेय उत्साहात होते. गाडीत त्यांची अखंड बडबड चालू होती. पण अमेय सगळा वेळ त्याच्या मोबाईलवरच गेम्स खेळत होता. आजूबाजूची झाडं, नद्या गाव 'याकडे त्याचं जराही लक्ष नव्हतं. अपर्णा मात्र भूगोलाच्या पुस्तकात दाखवलेली भौगोलिक वैशिष्ट्ये नीट पाहात होती.*

*अश्विनी शेतातली पीकं ओळखण्यात दंग होती. केदार आणि अश्विनीत जास्तीत जास्त पीकं ओळखण्याची चढाओढ चालू झाली. पण अमेय मात्र गेम्समधले मार्क वाढवण्यात गुंग. अचानक अमेयच्या बाबांनी गाडी बाजूला घेत थांबवली आणि म्हणाले, ‘‘आपण चुकलो तर नाही. फार लांब आल्यासारखं वाटतंय.’’ एवढा वेळ नाही लागणार शिबिराच्या गावाला पोहोचायला. भूगोलाचं पुस्तक आजूबाजूच्या प्रदेशातून वाचणारी अपर्णा पटकन म्हणाली, ‘‘काका याआधीच्या गावात पाटी होती... आपले गाव यायला १० कि.मी. अंतर आहे, असा मैलाचा दगडपण होता.’’ बाबा अपर्णाच्या या उत्तरामुळे आनंदून म्हणाले, ‘‘बरं झालं अपर्णा तुझं लक्ष होतं.’’ पण जरा पुढे गेल्यावर, असं लक्षात आलं की अलीकडेच वळायला हवं होतं. हे पाहून बाबा म्हणाले, ‘‘अमेय तू माझ्या फोनवरून GPS चालू कर.’’*

*अमेय म्हणाला, ‘‘काय GPS? हे मला नाही माहीत.’’*

*‘‘अरे, गाडी चालवताना मला एकीकडे GPS ट्रॅक करता येणार नाही.’’*

*‘‘पण मला नाही येत ते. आणि आता माझा या गेममधे Highest Score होणारे. जरा थांबा,’’ अमेय म्हणाला. केदार हळू आवाजात म्हणाला, ‘‘काका, मला माहीत आहे GPS कसा पाहायचा. माझ्या मामानं शिकवलंय मला. मी पाहिलं तर चालेल का?’’ अमेयचे बाबा लगेच ‘हो’ म्हणाले. आणि त्यांचा स्मार्ट फोन केदारकडे सोपवला. तेवढ्याच स्मार्टपणे तो वापरत केदारनं सगळा रस्ता सांगितला. GPS map वरून ते वेळेत साहस शिबिरात पोहोचले. केदारच्या बाबांनी केदारला अजून फोन घेवून दिला नव्हता; पण उत्सुकता असलेल्या केदारनं वेळोवेळी मामा, काका, दादा यांच्याकडून त्यातले अनेक apps वापरायला शिकून घेतले होते.*

***

साक्षी, आकांक्षा, निखिल, केदार – सगळेच आपापल्या प्रकारे स्मार्ट आहेतच. तुम्ही पण कुठल्या ना कुठल्या क्षेत्रात, कामात स्मार्ट असणारच. मग वाट कसली बघता...? तुमच्या स्मार्टनेसचे किस्से लिहून काढा आणि आम्हाला पाठवा. त्यातल्या ‘स्मार्ट’ प्रसंगाना ‘छात्र प्रबोधन’मध्ये प्रसिद्धी मिळेल.

**

**– सुनीला गोंधळेकर**
‘श्री’ बंगला, तुकाराम सोसायटी,
संतनगर, पुणे ४११००९

**छात्र प्रबोधनचे सभासद व्हा...**
**मासिकाची वर्गणी** – वार्षिक : ₹ **१८०**, द्वैवार्षिक : ₹ **३४०**, त्रैवार्षिक : ₹ **५००**, दशवार्षिक : ₹ **१,५००**.

**डोळस श्रद्धा हवी आम्हाला, नको न्याय उरफाटा...। हाक मारती सत्य शिवाच्या, सुंदर मंगल वाटा।।**

**अभिमानास्पद : खेलरत्न पुरस्कार – अंजली वेदपाठक भागवत** – तिरंदाजी (२००१–०२)
**प्रायोजक – श्री. निनाद रामचंद्र कात्रे, डोंबिवली.**

## करून तर पाहा...

दोस्तांनो, लाव्हारस पृथ्वीच्या पोटातून बाहेर येतो हे तुम्ही जाणताच. पण घरच्या घरी 'लाव्हारस' तुम्ही तयार करू शकता, बरं का... असे एकदम दचकू नका; त्यामुळे कोणतेच नुकसान होणार नाही; पण त्यातून तुम्ही दोन-तीन शास्त्रीय परिणाम मात्र पडताळून पाहू शकाल. चला तर मग करून बघा हा प्रयोग.

**लाव्हालॅम्प : साहित्य –** मीठ (३-४ चमचे), पाणी, १/४ कप वनस्पती तेल, खाण्याचे रंग (तांबडा, निळा, हिरवा आणि इतर कोणतेही), काचेचा मोठा पेला, २ ड्रॉपर

**कृती –** १. काचेचा पेला पाण्याने २/३ भरा.

२. पाणी स्थिर होऊ द्या.

३. त्यात ड्रॉपरने वनस्पती तेल हळूहळू घाला. (तेल पाण्यावर तरंगेल)

४. दुसऱ्या ड्रॉपरने पाण्यात आणि तेलात खाण्याचे रंग (एका पाठोपाठ एक) हळूहळू घाला.

५. त्यावर एक चमचा मीठ ग्लासमध्ये भुरभुरा; म्हणजेच हळूहळू ग्लासमधल्या मिश्रणात मीठ पसरून टाका.

६. रंगीबेरंगी 'लाव्हा' पेल्यात तयार झाल्यावर पेल्याच्या पाठीमागे दिवा (लॅम्प) लावा आणि अजून खराखुरा चमकणारा लाव्हा बघा. खाण्याचे वेगवेगळे रंग जेवढ्या प्रमाणात वापराल तेवढा तुमचा 'लाव्हा लॅम्प' जास्त चमकदार, तेजस्वी आणि खरा वाटेल आणि तोसुद्धा तुमच्या घरच्या काचेच्या पेल्यात!!

**निरीक्षणे नोंदवा –**

वरील मिश्रणात पुन्हा थोडं पाणी घातलंत तर काय होईल? त्यात अजून एक चमचा मीठ घातले तर काय होईल? मीठाच्या ऐवजी साखर किंवा कॉफी पावडर घातली तर काय होईल; करून पाहा आणि त्याची निरीक्षणे नोंदवा.

**नाचणारा लाव्हारस :** तुम्हाला नाचणारा लाव्हारस बघायचा आहे का? मग 'ॲन्टासिड'च्या गोळ्या (अपचन झाल्यावर घेतात त्या) वापरा, आणि सोडियम बायकार्बोनेट (खायचा सोडा) वापरून बघा. लाव्हालॅम्पच्या प्रयोगात वापरलेल्या ग्लासमधल्या मिश्रणात अँटासिडची गोळी टाका. गोळी मात्र एका वेळेस एकच टाका. गोळी पाण्यात तळाशी गेल्यावरच त्यावर एक-दोन चिमूट सोडियम बायकार्बोनेट टाका (खायचा सोडा). मग लगेच दुसरी गोळी टाका आणि बघा न थकणारा 'लाव्हारस' नाच.

**हे कसे घडते?**

१. वनस्पती तेलाची घनता पाण्यापेक्षा कमी असल्यामुळे ते पाण्यावर तरंगते.

२. तेलापेक्षा मीठ जड असल्यामुळे तुम्ही मिश्रणात जेव्हा मीठ टाकता त्यावेळेस ते मीठ काचेच्या पेल्याच्या तळाशी जाते. त्याचवेळी मिठाच्या कणांना थोडे तेल चिकटते.

३. जेव्हा मीठ पाण्यात पूर्ण विरघळते तेव्हा चिकटलेले तेल मिठापासून वेगळे होते आणि पुन्हा ते पाण्यावर तरंगते.

४. दिव्यामुळे पाणी गरम होते आणि 'लाव्हा रसाचा नाच' आपल्याला पाहायला मिळतो.

५. तुम्ही जेव्हा 'ॲन्टासिड' ची गोळी आणि सोडियम बायकार्बोनेट टाकता, तेव्हा कार्बन डायऑ साईड गॅसचे छोटे बुडबुडे पाण्याच्या वर येतात. ते आपल्याबरोबर थोडं रंगीत पाणीही घेऊन येतात. म्हणजेच बुडबुड्याच्या बाहेर थोडं रंगीत पाणी चिकटलेलं असतं. हा गॅसचा बुडबुडा पृष्ठभागावर आला, की हवेच्या दाबाने फुटतो. रंगीत पाणी पुन्हा खाली जाते. ॲन्टासिडच्या गोळीमध्ये सायट्रीक ॲसिड असतं. गोळी आणि खायच्या सोड्याची रासायनिक प्रक्रिया पाण्याबरोबर घडते. या प्रक्रियेतून सोडियम सायट्रेट आणि कार्बन डायॉ साईड गॅस तयार होतो. तो पाण्याच्या पृष्ठभागावर येतो.

**हेही करून बघा –** १. काचेचे वेगवेगळ्या आकाराचे पेले घेतले तर? २. पेल्यांवर डिझाईन असेल तर? दिव्याला निरनिराळ्या रंगाचे कागद लावले तर?

**– डॉ. कांचनगंगा गंधे**

४१/६६७ लोकमान्यनगर, पुणे 411030

आमच्या बाई प्रेमळ फार। उघडून देतात ज्ञानाचे दार॥

अभिमानास्पद : खेलरत्न पुरस्कार – के. एम. बीनमोल – ॲथलेटि स (२००२-०३)

प्रायोजक - संतुल, (श्री. मिलिंद संत), पुणे.

# एम फॉर मराठी

**– आसावरी गोखले**

**(सीडीवर एका हिट गाण्याचा आवाज ऐकू येत आहे. एक किशोरवयीन मुलगा त्या गाण्यावर मनसो त नाचतच विंगेतून बाहेर येतो. नाचता-नाचताच पायातले बूट काढतो. मोजेही काढून कोपऱ्यात फेकतो. त्या तालावरच खोलीतला पसारा आवरू लागतो. तेवढ्यात अचानक ते गाणे बंद होते आणि खट याचा आवाज होऊन एका संस्कृत स्तोत्राची सीडी सुरू होते. तो मुलगा आधी काहीच न कळल्यामुळे बावचळून थांबतो. मग काहीतरी लक्षात आल्याप्रमाणे प्रेक्षकांकडे पाहात बोलू लागतो.)**

---

आशुतोष : आल्या आमच्या बहिणाबाई ! नेमका माझा असा मस्त *मूड* लागतो, तेव्हाच ही कॉलेजमधून टपकते आणि सुरू होतात तिचे संस्कृतचे  लासेस. काहीतरी *बोअरिंग* आणि न कळणारं असं – 'देवा देवो देवम्' अशाच काहीतरी *टाइपचं* बोलत असतात सगळे मिळून. आणि जेव्हा कोणी *स्टुडंट* नसेल तेव्हा आपला भाऊ असतोच ह काचा ! मग आमची शाळा सुरू ! शाळेत असेपर्यंत चांगलं माणसासारखं वागायची, बोलायची हो, ही ताईटली; पण दहावीत तिला संस्कृतमध्ये *नाइन्टी नाइन मार्कस्* मिळाले आणि भारावून जाऊन तिनं *आर्टस्‌ला* प्रवेश घेतला... म्हणजे *ॲडमिशन* हो ! नंतर 'मराठी वाङ्मय मंडळ' का काय ते *जॉइन* केल्यापासून तर तिची *लँग्वेजच* बदलली. रोजची मिंग्लिश, मिंदी आणि हिंग्लीश सोडून च क शुद्ध मराठी बोलायला लागली. बरं, तुला बोलायचं तर बोल ना... पण आम्हाला कशाला *फोर्स* करते? पुन्हा हे तिच्या तोंडावर बोलायची सोय नाही. म्हणजे आपण काय घाबरत नाही हं तिला. पण उगीच कशाला पंगा घ्यायचा? तसा मी एक-दोनदा *ट्राय* करून पाहिला पण मग 'मराठी भाषेची अधू गती का काय...' असलं काहीतरी भाषण ऐकावं लागतं. आता वा यात एकही इंग्लीश, हिंदी *वर्ड* न आणता बोलायचं म्हणजे अतिच ना? पण मी काही बोलायला लागलो की सुरू हिची बडबड, 'एक वा य शुद्ध मराठीत बोलता येत नाही तुम्हा आजकालच्या मुलांना.'

हुं ! आजकालच्या मुलांना म्हणजे? जसं काही ही प्राचीन *सेंचुरीतच बॉर्न* झालीये. असो. तर *पॉइंट* काय आहे, की प्रत्येक वा यावर तिचं *ऑब्जेक्शन* असतं. त्यात पुन्हा शब्दाशब्दावर मारामारी. एकदा मी 'अंध:कार' असं म्हणालो तर म्हणे मूळ शब्द तसा नाहीच्चे. मग कसा आहे, तर म्हणे 'अंधकार.' आधीच मी असल्या *डेडली* शब्दांच्या वाटेला जात नाही. आणि मला एक कळत नाही, काय फरक पडतोय? आपलं म्हणणं *कन्व्हे* झाल्याशी कारण! पण




नाही. ताई एक अक्षरही सोडत नाही. इंग्लीश *'एफ्'* चा आणि मराठीतल्या 'फ' चा उच्चार कसा वेगवेगळा आहे हे तिनंच मला सांगितलं. माझं आ-शु-तो-ष हे नाव तिनं 'श' आणि 'ष' च्या उच्चारासाठी माझ्याकडून आणि माझ्या मित्रांकडून शंभरदा *लर्न* करून घेतलं आहे. थोड यात काय, आमची ताई म्हणजे भाषेचा कीस काढणारी किसणी आहे झालं!

पण एक सांगू का? मी जेव्हा 'सारे सारे गा – किड्स् स्पेशल'मध्ये भाग घेतलेला ना, तेव्हा सगळ्या *जजेसनी* शब्दांच्या उच्चारांबद्दल मला *ॲप्रिशिएट* केलं. त्याचं *क्रेडिट* मात्र *हंड्रेड पर्सेंट* ताईलाच बरं का ! त्या प्रोग्रामच्या *रिहर्सलला* तर *सॉलिड* धमाल आली. त्या दिवशी आई आणि बाबा दोघांनाही वेळ नसल्यामुळे मी



खिडकीमधून वाहत होते, ढग गोरेपान। घिरट्या घालत होत्या घारी, पाखरगाणे छान।।



ताईबरोबरच तिथे गेलो होतो. त्या *अँकरनं* सुरुवात केली, ‘सारे सारे गा’ च्या या *किड्स स्पेशल एपिसोडमध्ये* सर्व दर्शकांचं मी दूरदर्शनच्या वतीनं स्वागत करतो. आज आपल्याकडे चार छोटे स्पर्धक आले आहेत. केतकी, मानसी, आशुतोष आणि रौनक! आमचे हे छोटे *पार्टिसिपन्ट्स्* भल्याभल्यांचीही सुट्टी करून टाकतील आणि एका *हॅपनिंग इव्हेंटचा* आनंद तुम्हाला देतील हा आमचा वादा आहे. तर त्यांच्यासाठी एकदा जोरदार टाळ्या होऊन जाऊ द्या. आणखी एक *रिमाइंडर* म्हणजे आमच्या *टेलिफोन लाइन्स ओपन* झाल्या आहेत. अजून तुम्ही आपल्या *फेव्हरिट* स्पर्धकाची मदत केली नसेल; तर जागो, दर्शक, जागो ! जरा आपल्या डेली *रूटिनमधून* बाहेर झाकून बघा आणि एस्‌एम्‌एस्‌द्वारा *वोट* करून या *ग्रेट इव्हेंटमध्ये* आपणही सामील व्हा ! आता आपल्या आजच्या *कॉम्पिटिशनकडे* वळू या. आज आपले नेहमीचे *जजेस* तर आहेतच शिवाय जोरदार टाळ्यांनी स्वागत करू या आपले आजचे *गेस्ट...*'' हे असलं निवेदन ऐकून आमच्या ताईबाई भडकल्या. तिच्या तळपायाची आग मस्तकात पोचली म्हणे ! तरातरा उठून ती *स्टेजवर* आली आणि एक *लेक्चरच* ठोकलं तिने. ''अहो, हा कार्यक्रम मराठी आहे ना? मग असलं नाममात्र मराठीकरण केलेलं हिंदी काय बोलताय? मराठी भाषेत सार्थ शब्दांची आणि वा प्रचारांची कमतरता आहे का? मग आपलं म्हणणं प्रेक्षकांपर्यंत पोचवण्यासाठी तुम्हाला हिंदी, इंग्रजीच्या कुबड्या का लागाव्यात? हिंदी किंवा इंग्रजी भाषेला आमचा विरोध नाही. त्याही भाषा त्यांच्या शुद्ध स्वरूपात जपल्या पाहिजेत. मराठी ही अतिशय प्रगल्भ आणि विकसित भाषा आहे, पण सतत अशी धेडगुजरी भाषा ऐकून नवीन पिढीला एकेका भाषेची नीट ओळखच होणार नाही. मराठीतले एकेक शब्द न वापरल्यामुळे हळूहळ नष्ट होत जातील आणि अशीच स्थिती सगळ्याच भाषांची होईल...'' ताई हे सगळं बोलत असताना मला तर एकदमच *ऑड* वाटत होतं. सगळेजण माझ्याकडे चमत्कारिक नजरेने बघताहेत असं वाटून मी तर मान खाली घालून उभा होतो. पण खरा *क्लायमॅक्स* तर पुढेच आहे. ताईच्या त्या भडिमाराने सगळे *‘स्टॅच्यू’* केल्यासारखे उभे होते. तेवढ्यात टाळ्या वाजवत एकजण पुढे आले. त्यांनी ताईचं कौतुक केलं आणि त्या *अँकरला* पुन्हा *स्क्रीप्ट* लिहायला सांगितलं. तेही ताईच्या मदतीनं. ते काका म्हणजे ‘दूरदर्शन’ चे मोठे अधिकारी आहेत आणि लेखकही आहेत म्हणे. मग काय, आमची *कॉलर* एकदम ताठ !

आता खरं सांगायचं तर त्या दिवशी ताई जे काही बोलली, त्यातलं बरंचसं विचार केल्यानंतर मलाही पटायला लागलंय. परवाच मी एका *आर्टिकलमध्ये* वाचलं की युरोपातल्या जर्मन, फ्रेंच, स्पॅनिश अशा भाषांमध्ये फ त कथा–कविताच नाहीत तर सायन्स – *सॉरी सॉरी,* विज्ञान, तंत्रज्ञान, तत्त्वज्ञान अशा विषयांवरही सातत्यानं लेखन केलं गेलं. म्हणूनच त्या प्रत्येक क्षेत्रात या भाषा स्वयंपूर्ण आहेत. इंग्रजीवर अवलंबून नाहीत. मोठ्ठं झाल्यावर मराठी भाषेत असंच काम आपणही करावं म्हणतोय, पण त्यासाठी मला आत्तापासूनच अभ्यासाला लागायला हवं. असा बोलण्यात वेळ घालवून चालायचं नाही. बरंय तर मग, नमस्ते !

* *

**– आसावरी गोखले**
१४, कल्पिका, शीलाविहार कॉलनी,
एरंडवणे, पुणे 411038

सदा ध्यास अभ्यास जीवी धरावा। तयाने परीक्षेत होईल ‘वा वा’।।



अभिमानास्पद : खेलरत्न पुरस्कार – लेफ्टनंट कर्नल राजवर्धन सिंग राठोड – तिरंदाजी (२००४–०५)
प्रायोजक - डॉ. संतोष काकडे, नागपूर.

# संवाद कौशल्य

लेखांक – १४

## संवादातील अडथळे

– स्मिता निरगुडकर

तुमचा कधी, कुठे, कोणाबरोबर बोलताना, ऐकताना गैरसमज झालाय का?

त्यावर तुम्ही म्हणाल गैरसमज कसा होतो? आमचा तर नेहमी समजच होतो.

बरोबर आहे, म्हणजे जो होतो तो 'समज'च असतो, नाही का? मग त्याचे गैरसमजात रूपांतर कसे होते? आपला समज 'गैर' होता? हे आपल्या केव्हा लक्षात येते.

या समज–गैरसमजाच्या द्वंद्वामध्ये आपली मन:स्थिती नेमकी कशी असते? संवाद होतो, म्हणजे नेमकं काय घडत असतं? ते आपण थोड यात पाहू.

- आपल्याला किंवा समोरच्याला एकमेकांशी काहीतरी सांगायचे, बोलायचे असते.
- आपण किंवा समोरचा स्वत:च्या क्षमतेप्रमाणे, समजत असणाऱ्या भाषेत तो विचार शब्दबद्ध करतो.
- उपलब्ध साधने/माध्यमे वापरून समोरच्याला आपल्या भावना पोहोचवण्याचा प्रयत्न करतो.
- ऐकणारी व्य ती तिची मनस्थिती, आकलन, पूर्वानुभव, मते, तिची ऐकण्याची क्षमता ह्या नुसार त्या शब्दांचे अर्थ लावतात.
- आपल्या आकलनानुसार त्या व्य तीला प्रत्युत्तर देतात.
- समोरासमोर संवाद होत असेल, तर दोघांचीही देहबोली शब्दांपेक्षा जास्त बोलते.

आपला संवाद समोरासमोर असू देत किंवा कोणत्याही माध्यमातून असू देत, प्रत्येक वेळी आपल्याला अपेक्षित अर्थ समोरच्यापर्यंत पोहोचतोच असे नाही. संवाद–विसंवाद, या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. आपला स्वभाव, आपल्या जाणिवा, त्या बरोबरच इतरही काही गोष्टी महत्त्वाची भूमिका करत असतात. आपल्या संवादात अडथळे निर्माण करणारे महत्त्वाचे घटक कोणते, ते आता आपण पाहू.

१. तांत्रिक स्वरूपाचे घटक
२. भावनिक स्वरूपाचे घटक
३. सांस्कृतिक/भाषिक भेदामुळे निर्माण होणारे अडथळे
४. शारीरिक व्यंगामुळे संवादात निर्माण होणारे अडथळे

**१. तांत्रिक स्वरूपाचे घटक –** अनेक तज्ज्ञांच्या मते आजचे युग हे संवाद क्रांतीचे युग आहे. एकमेकांशी संवाद साधण्यासाठी अनेक तांत्रिक स्वरूपाची साधने उपलब्ध आहेत. उदा. पत्र, टेलिफोन, फॅ स, इ.मेल, मोबाईल इत्यादी.

या तांत्रिक माध्यमाच्या साहाय्यानं संवाद साधत असताना पत्रातील अक्षर अस्पष्ट, गिचमिड, खूप छोटे असणे. टेलिफोनवरील बोलणे नीट ऐकू न येणे, फॅ सवरील मजकुरावर काळे डाग, रेघा, अस्पष्ट मजकूर छापला जाणे यांमुळे आपल्या संवादात अडथळे निर्माण होऊ शकतात.

**२. भावनिक स्वरूपाचे घटक –** ज्या व्य ती बरोबर संवाद करायचा आहे ती व्य ती व जी संवाद करू इच्छिते ती व्य ती, अशा दोन्ही व्य तींची मनस्थिती, आकलन, पूर्वानुभव, मत, त्यांची बोलण्याची व ऐकण्याची क्षमता या घटकांवर संवादातील परिणामकारकता अवलंबून असते. त्यासाठी खालील मुद्द्यांचा आपण विचार करू.

- मिळालेल्या माहितीचा आपल्या पूर्वग्रहांनुसार अर्थ काढणे किंवा आपल्याला सोयीस्कर अर्थ काढणे.
- आपल्या त्या वेळेच्या भावनांना अनुसरून विचार करणे. उदा. आपण रागावलेले, चिडलेले, चिंताग्रस्त, भयग्रस्त असलो, तर आपल्या विचारांवर त्या भावनांचा परिणाम होतो. आपण प्रभावीपणे संवाद साधू शकत नाही. कधी कधी आपल्या पेक्षा ज्येष्ठ, वरिष्ठ यांच्याशी संवाद करताना भीती, संकोच या



नवा जोश भरून घ्या, मन करा ताजे। पुस्तकात शिरल्यावर, तुमचे तुम्ही राजे।।

अभिमानास्पद : खेलरत्न पुरस्कार – पंकज अडवाणी – बिलियर्ड्स आणि स्नूकर (२००५–०६)



प्रायोजक – व्ही. व्ही. आर्किटे ट प्रा. लि., पुणे.

भावनांमुळे स्पष्ट बोलणे आपल्याला अवघड जाते. त्यामुळे कदाचित संवादाचा चुकीचा अर्थ लावला जाण्याची श  यता असते.

- एखादा संदेश, संवाद जर चुकीच्या प्रकारे त्यात फेरफार करून पाठविला गेला, तर विसंवाद होण्याची खूप श  यता असते. त्यासाठी आपण जो कानगोष्टीचा खेळ  खेळतो, ते उदाहरण खूप योग्य ठरेल.
- समोरच्याचं बोलणं ऐकण्याची आपल्याला इच्छा असेल तर आपले मन त्या बोलण्याचा नीट विचार करू शकते. पण तशी जर आपली इच्छा नसेल तर आपले मन नवीन कल्पना वा दृष्टीकोनाचा स्वीकार करायला, चटकन त्यावर विचार करायला तयार होत नाही.  यामुळे संवादात अडथळे येऊ शकतात.
- समोरच्याचं बोलणं पूर्णपणे ऐकण्यापूर्वीच अधीरपणे व क्षणिक प्रतिसाद देण्याची घाई करणं, बोलणं, मध्येच तोडणं, पुरेसा विचार न करता आपले विचार आग्रहानं मांडणं. या कारणांनी संवाद नीट होऊ शकत नाही. उदा. वर्गात शिक्षकांनी विचारलेला प्रश्न नीट न ऐकताच उत्तर देण्याची घाई करणं.
- संवादात 'ऐकण्या'ला खूपच महत्त्व असते. समर्थ रामदास स्वामी  हेच सांगतात की श्रवण व मननाच्या साहाय्याने दुसऱ्याचे म्हणणे नीट समजून घेतले पाहिजे. बोलणारा कितीही प्रभावीपणे बोलला; पण ऐकणाऱ्याने त्या  बोलण्याकडे लक्ष दिले नाही, दुर्लक्ष केले तर तो संवाद अर्धवटच राहील. आधुनिक व्यवस्थापन शास्त्रातील गुरू स्टीफन कोवे म्हणतात, की समोरच्याचं बोलणे नीट न ऐकल्याने संवाद अपूर्ण राहतो व गैरसमजांना जागा मिळते.
- ज्याच्याकडून माहिती मिळत आहे किंवा ज्याला आपण माहिती देणार आहोत, त्याच्या विषयी आपल्या मनात आकस किंवा अविश्वास असेल तर माहितीचा चुकीचा अर्थ निघू शकतो.

**३. सांस्कृतिक भेद –** जागतिकीकरणामुळे जग खूप जवळ आले आहे. अशावेळी परदेशात संदेश वहन करताना आपल्या व त्यांच्या संस्कृतीतील फरक लक्षात घेणे आवश्यक ठरते आहे. देहबोली, प्रतिकं, रंगांशी निगडित अर्थ यात देशपरत्त्वे फरक होत असतो. त्याचा विचार संवाद साधताना केला नाही तर विसंवाद घडू शकतो.

- भाषाभेद – एका भाषिक समाजातसुद्धा दर दहा मैलांवर भाषा बदलत असल्यामुळे संवादात भाषेमुळेदेखील अडथळे निर्माण होतात.

**४. शारीरिक व्यंग –** बोलण्यातील तोतरेपणा, स्पष्ट शब्दोच्चारांचा अभाव यांमुळेदेखील आपल्याला प्रभावी संवाद साधताना अडथळा निर्माण होतो.

संवादातील हे प्रमुख अडथळे किंवा विसंवादाची ही प्रमुख कारणे सांगता येतील. या पेक्षा आणखीही काही वैयि तिक कारणे आपण नोंदवू शकू. ही विसंवादाची कारणे आपण आपल्या वागण्या-बोलण्याच्या पद्धतीत कोणत्या प्रकारचे बदल करून टाळू शकतो, याचा  विचार थोड  यात करूयात.

- सर्वात प्रथम ज्या विषयावर आपण बोलणार आहोत त्या विषयाचे आपले ज्ञान परिपूर्ण आहे ना, हे तपासू.
- संवादाची सुरुवात करताना आपल्या भावना सकारात्मक असतील अशी काळजी घेऊ.
- ज्या विषयावर आपण बोलतो आहोत, त्याला जुळणारे  हावभाव, देहबोली ठेवण्याकडे लक्ष देऊ.
- बोलताना योग्य शब्दांवर जोर देऊ, आवश्यक तेथे थांबू, शब्द स्पष्टपणे उच्चारू, समोरासमोर बोलत असू तर नजरेला नजर भिडवून बोलू. इ. गोष्टींकडे कटाक्षानं लक्ष देऊ.
- संभाषण चालू असताना इतर गोष्टींना महत्त्व न देता. समोरच्याचे म्हणणे शांतपणे, एकाग्रतेनं ऐकून घेऊ.

संवादाचे यश अखेर आपल्या भावना समोरच्याला कळण्यात आहे. बोलणे अथवा लिहिणे किंवा इतर तत्सम गोष्टी ही केवळ साधने आहेत. या साधनांशिवाय ही संवाद होतच असतो. गरज असते ती फ  त समोरच्याला समजून घेण्याची.

**

– स्मिता निरगुडकर
प्रज्ञामानस संशोधिका, ज्ञान प्रबोधिनी,
५१० सदाशिव पेठ, पुणे 411030

## ध्येयास ती महान टेनिसपटूची



प्रत्येक विद्यार्थ्याला शालेय शिक्षणापासूनच काही ना काही गोष्टी मिळवण्यासाठी परिश्रम करावे लागतात. ज्या विद्यार्थ्याला आपले ध्येय सापडले, तो त्याच्या आयुष्यातील आनंदाचा आणि आव्हान स्वीकारण्याचा क्षण ! यानंतर सुरू होते ध्येयपूर्तीची लढाई. अथक परिश्रम, साधना, एकाग्रतेने केलेला पाठपुरावा, शिस्त, ज्येष्ठांचे मार्गदर्शन व अनुभव अशा अनेक गोष्टींचा उपयोग करीत ही ध्येयास ती यशाकडे वाटचाल करीत असते. याबरोबरच यशाचे शिखर गाठलेल्या साधकाचे अनुभव, त्यांची वृत्ती या विषयीची माहिती ही आपणास एक नवीन जाणीव किंवा दृष्टी देवू शकते. 'बिर्ला जीन किंग' या प्रसिद्ध महिला टेनिसपटूने लिहिलेल्या **Pressurs is a priviledge** या पुस्तकात टेनिस जगतातील जी उदाहरणे दिली आहेत, ती सर्वच विद्यार्थ्यांना त्यांच्या ध्येयप्राप्तीकडे मार्गक्रमण करताना न कीच उद्‌बोधक ठरतील.

ही गोष्ट आहे, १४ ग्रँड स्लॅम स्पर्धा जिंकणाऱ्या अमेरिकन महान खेळाडू **पीट सॅम्प्रास** याची. लोकांना खूप वेळा आश्चर्य वाटतं की, ह्या पराक्रमी खेळाडूने राष्ट्रीय कुमारगटाचे अजिं यपद कधीच कसे जिंकले नाही? कारण त्यानं आपलं सगळं लक्ष केंद्रित केले होते, सर्वोत्कृष्ट टेनिसपटू बनण्याच्या अत्युच्च ध्येयावर ! त्यामुळे जरी तो कुमार गटातील सामन्यातही हिरिरीने खेळत होता, तरी त्याचं लक्ष त्याहूनही मोठ्या उद्‌दिष्टाकडे; जगातला अव्वल दर्जाचा खेळाडू होण्याकडे होते. त्यामुळेच आपला खेळ सर्वंकष सुधारण्याच्या प्रयत्नात तो होता. यासाठी सगळ्या लहान आणि थोर खेळाडूंबरोबरही तो खेळत राहिला. या सर्वांबरोबर खेळून नवनवीन कौशल्ये आत्मसात करीत राहिला. त्यामुळेच त्याच्या खेळात वैविध्यपूर्ण फट यांची आणि मौल्यवान अनुभवाची भर पडली. त्यामुळेच आपल्या ध्येयाची मार्गक्रमणा करताना कुमार गटातील आपल्या स्थानाविषयीची त्यानं फारशी फिकीर केली नाही. तर कुमार गटात विजयी होण्यापेक्षा स्वत:चा खेळ जास्तीत जास्त कसा उंचावेल, हे त्याला जास्त महत्त्वाचं वाटलं. त्यानं आपली सगळी ऊर्जा, ताकद अंतिम ध्येयाच्या दिशेने एकवटली होती. त्यातली थोडीशीसुद्धा वर्षे कुमार गटाच्या निकालाबाबत विचार करण्यात त्यानं वाया घालविली नव्हती. ध्येयास ती कशी असावी, याचं हे उत्तम उदाहरण आहे.

* *

**– श्रीकृष्ण रानडे**
एच ३०३, सप्तसूर, डी. एस. के. विश्व, धायरी, पुणे 411041

वैजनाथ दुलंगे/मधुजा पारगावकर



गर्द घनेरी रान सावळे, किर्र दरी उदरात। रम्य तजेल्या रानफुलांचे, पर्व नवे बहरात।।

अभिमानास्पद : खेलरत्न पुरस्कार – महेंद्रसिंग धोनी – क्रिकेट (२००७–०८)
प्रायोजक – कु. रेवती सारंग वऱ्हाडपांडे, पुणे.

# चिमण्यांनो...



चिमण्यांनो जरा
धीर धरा रे
विनाशाचा रस्ता
नाही बरा रे ।।१ ।।

सोंडेने लाकडं
फोडू नका रे
मुंगीची चिकाटी
सोडू नका रे ।।२ ।।

जिद्द चिकाटीने
यश मिळते
वेळेआधी काय
फूल फुलते?।।३ ।।

फुलू द्या जीवन
फुलासारखे
सुगंधाला नका
होऊ तुम्ही पारखे।।४ ।।

निराशेचे सूर
दूर करा रे
निश्चयाचे बळ
मनी भरा रे।।५ ।।

भरा भरा आनंद
मनामध्ये रे
ऊसळू द्या चैतन्य
तनामध्ये रे ।।६ ।।

चिमण्यांनो थोडे
करारी व्हा रे
उंच आकाशात
भरारी घ्या रे।।७ ।।


**– डॉ. अशोक कौतिक कोळी**

'कूड' गणपतीनगर से टर – ३, जळगाव रस्ता, जामनेर, जि. जळगाव 424206


झुळझुळ वारे, सळसळ पाने । शाळेमध्ये वाहे, पाखरांचे गाणे ।।



अभिमानास्पद : खेलरत्न पुरस्कार – मेरी कोम – मुष्टीयुद्ध (२००७–०८)

प्रायोजक – श्री. सुरेंद्र कापसे, प्रिन्स्टन, अमेरिका.

# ‘माणूस’ म्हणून घडविणारे ‘पाटील गुरुजी’

– समाधान पुजारी

***आपल्या शालेय शिक्षणाची सुरुवात होते तीच मुळी आपल्यावर माया करणाऱ्या, प्रसंगी धाक दाखवणाऱ्या अध्यापकांचं बोट पकडून ! सगळ्याच अध्यापकांविषयी गुरू म्हणून आदराची, कृतज्ञतेची भावना मनात असली, तरी त्यातील एखादा आपल्या कायम स्मरणात राहातो. त्यांचं वागणं, शिकवणं, त्यांचं व्यक्तिमत्त्व यांचा ठसा मनावर खोल उमटतो.***

***५ सप्टेंबर हा शिक्षकदिन ! त्यानिमित्ताने श्री. समाधान पुजारी यांनी रेखाटलेलं ‘पाटील गुरुजी’चं लोभस व्यक्तिचित्रण वाचूया.***

प्रत्येक सामान्य माणसाच्या जीवनात आई-वडील, घरदार, नाती-गोती अशांच्या अनेक आठवणींबरोबर आपल्या शाळेच्याही आठवणी असतात. त्यातील शिक्षकांनी केलेले आणि शाळेचे म्हणून संस्कार होतच असतात. म्हणूनच आई-वडिलांच्या ऋणांबरोबर शाळेचंही ऋण, प्रत्येक माणसाच्या आयुष्यात असते आणि ते कधी न फिटणारे असते. आयुष्यातील जडणघडणीचा मोठा काळ आपण आपल्या शाळेबरोबर घालविलेला असतो.

आजही मला शाळेचा पहिला दिवस आठवतो. नवीन वातावरणाचं-नव्या जागेचं थोडंसं दडपण, नवे मित्र, नवे शिक्षक कसे असतील याची उत्सुकता; अशा संमिश्र भावनेनं शाळेत मी पाऊल टाकलं. शाळेचं उत्साही, आनंदी वातावरण पाहून मनावरचं ते दडपण कधी निघून गेलं, हे माझं मलाच समजलं नाही. हळूहळू मला शाळेचा लळा लागला. त्याचं महत्त्वाचं एक कारण म्हणजे जिल्हा परिषद मुलांची शाळा ‘खरसुंडी’ मधील आमचे शिक्षक **बाजीराव पाटील.**

‘गुरुजी’ शब्दामध्येच किती आपुलकी, आत्मीयता दडलेली आहे. आजच्या ‘सर’ या शब्दाला तिची सर कधीच येणार नाही. ध्येयाने प्रेरित झालेली माणसंच जीवनात खऱ्या अर्थानं चांगलं काम करू शकतात. पाटील गुरुजी त्यांपैकीच एक. गावामध्ये व शाळेत पाटील गुरुजींना आदराचं स्थान होतं. ‘विद्यार्थीप्रिय शिक्षक’ असाच त्यांचा लौकिक होता.

आपलं पोरगं पाटील गुरुजींच्या वर्गात शिकतंय ना; मग काळजीचं कारण नाही, असा ठाम विश्वास





मधुसंचय करण्याची धडपड पाहून, मीही झाले तत्पर। कपाटातले घेऊन पुस्तक, ज्ञानसंचया भिडले सत्वर।।

अभिमानास्पद : खेलरत्न पुरस्कार - विजेंदरसिंग - मुष्टीयुद्ध (२००८-०९)

प्रायोजक - श्री. ऋषिकेश कुलकर्णी, पुणे.

पालकांच्या मनात होता. विद्यार्थी 'परीक्षार्थी' न होता, 'ज्ञानार्थी' व्हावा, अशी त्यांची तळमळ होती आणि त्यासाठीच त्यांनी अविश्रांत धडपड केली.

आकर्षक वाटावं असं व्यि तिमत्त्व, मधुर भाषा, वर्गात हलकं- फुलकं वातावरण, जिव्हाळा उत्पन्न व्हावा अशी विवेचनाची शैली यामुळे गुरुजींचे तास ही विद्यार्थ्यांना पर्वणी वाटत होती. पुस्तकात वाचून गुरुजी कधीच शिकवत नव्हते. वर्गात येता क्षणीच सुहास्य मुद्रेनं गुरुजींच्या अध्यापनास प्रारंभ व्हायचा. तास सुरू झाला हे विद्यार्थ्यांना समजत होतं; पण संपला कधी हे मात्र त्यांच्या लक्षात येत नसे.

विषयाची परिपूर्ण तयारी, शिकवताना लागणारे संदर्भ, रोजच्या आयुष्यातील घटनांची ताजी उदाहरणे यामुळे त्यांचं शिकवणं मनोरंजक व सरस व्हायचं. अर्थातच त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये ते लोकप्रिय व्हायला वेळ लागला नाही.

'शिक्षणाला अग्रक्रम आणि त्यापाठोपाठ सारे उपक्रम' असं घोषवा यच त्यांनी निवडलं होतं. त्यामुळे चाकोरीतील, पण तरीही अत्यावश्यक अशा पुस्तकी शिक्षणाबरोबरच शाळेतील इतर उपक्रमांना ते प्रोत्साहन देत. प्रत्येकातील कलागुण ओळखून त्याप्रमाणे त्या विद्यार्थ्याला गुरुजी उपक्रमांमध्ये सहभागी करून घेत. मग ते गायन असो वा व तृत्व, नाट्य, चित्रकला वा खेळ असो; त्या उपक्रमांमध्ये आम्ही रमून जायचो. गुरूजी मराठी कवितांना इत या सुंदर चाली लावत, की त्या कधी पाठ होऊन जात ते आम्हाला कळतही नसे.

गुरुजींनी विद्यार्थी म्हणजे सर्वस्व मानले. त्यांच्या उत्कर्षासाठी गुरुजींनी स्वत:ला वाहून घेतले. प्रत्येक विद्यार्थ्यांची त्यांना खडा न् खडा माहिती असायची. मुलांच्या घरच्यांचीही ते आस्थेनं चौकशी करायचे. म्हणूनच विद्यार्थ्यांच्या पाठीवरून प्रेमाने हात फिरवणारे गुरूजी विद्यार्थ्यांचा जीव की प्राण व्हायचे. दिनविशेष, नियतकालिक, हस्तलिखित, व तृत्व, सहल असे अनेक उपक्रम राबवणाऱ्या शिक्षकांना त्यांनी शिस्त लावली. चांगल्या गोष्टींचे कौतुक व बेशिस्त वर्तनाला प्रसंगी कठोर शिक्षा त्यांनी केली.

...गुरूजींनी आम्हाला काय दिलं हे शब्दांत सामावणार नाही. चाकोरी बाहेरच्या व्यापक विश्वामधे काहीतरी वेगळं करून दाखवण्याचं धारिष्ट्य गुरुजींनी दिलं. स्वत:पुरता संकुचित विचार न करता समाजाचा विचार करायला गुरुजींनी शिकवलं. प्रसिद्धी-पैसा या मोहाच्या आहारी न जाता ध्येयनिष्ठ आयुष्य जगण्याची त्यांनी दिशा दिली. त्यांनी दुर्गम पाड्यातील वस्त्या दाखवून विसंगतीची जाणीव आम्हाला करून दिली. विद्येप्रमाणेच माणुसकीचेही संस्कार करणाऱ्या गुरुजींनी आमच्या पंखांमध्ये प्रचंड बळ दिलं. आनंदाने शाळेचे दिवस जात होते. साखर स्वत:चे अस्तित्व विसरून पाण्याशी एकरूप होते; त्याप्रमाणे आम्ही गुरूजींशी एकरूप झालो होतो.

अचानक एके दिवशी 'पाटील गुरुजींची बदली होणार आहे,' अशी बातमी येऊन धडकली. गुरुजींची बदली त्यांच्या गावाजवळ व सोईच्या ठिकाणी होणार होती. आपले लाडके गुरूजी आता जाणार, हे समजताच सारे निरागस चेहरे केविलवाणे, निराश झाले. गुरूजींनी बदली रद्द करून घ्यावी असा एकमात्र हट्ट आम्ही सर्व विद्यार्थ्यांनी धरला. शेवटी गुरुजींनासुद्धा स्वत:चे अश्रू आवरणे जमले नाही. त्या दिवशी खिन्न मनाने सर्वजण घरी परतले. दुसऱ्या दिवशी शाळेत येताच समजले की, गुरूजींनी त्यांची बदली जरी ती त्यांच्या सोईच्या ठिकाणी होती तरी ती रद्द करण्यासाठी अर्ज केला आहे. त्यामुळे प्रत्येक विद्यार्थ्याच्या चेहऱ्यावर जग जिंकल्याचा आनंद ओसंडून वाहत होता. त्याच वर्षी आम्ही माध्यमिक शिक्षणासाठी हायस्कुलकडे रवाना झालो. गुरूजींनी त्याच शाळेत अजून पुढची पाच वर्षे अध्यापनाचे काम केले.

शिक्षक म्हणून कोवळ्या मनावर त्यांनी केलेले संस्कार कायमच माझ्यासाठी पथदर्शी आहेत. गुरूजींच्या शिकवण्याच्या आठवणी मनात बकुळीच्या फुलाप्रमाणे अजूनही सुगंधित आहेत. शालेय जीवनातील काही शिक्षक आपल्या आयुष्यभर लक्षात राहतात... आमच्या बाजीराव पाटील गुरूजींसारखे.

* *

**- समाधान पुजारी,**
अभियांत्रिकी महाविद्यालय, शिवाजीनगर, पुणे 411005

**गुरुजीची माया हाये, आमावरी भारी। शिकवती आम्हा, देती ज्ञानाची शिदोरी।।**



**अभिमानास्पद : खेलरत्न पुरस्कार - सुशील कुमार -** कुस्ती (२००८-०९)
**प्रायोजक - श्री. अजित भिडे** (डायरे टर, ॲसेंट हॉस्पिटॅलिटी प्रा.लि. ☎ २५३८०४०६) **पुणे.**

## मुलांचे पान



# परीक्षा नसत्या तर...

''आई ऽऽ, ए आई ऽऽ मी खेळायला जातोय गं,'' असं म्हणून संध्याकाळी मी घराबाहेर पडलो. सर्व मित्रांना हाका मारत मारत आमची *गँग* खेळायला मैदानावर जमली. आम्ही क्रिकेट खेळायला सुरुवात केली. खेळ मस्त रंगात आला होता. हळूहळू अंधार पडायला लागला. बराच वेळ झाला तरी कोणाच्याच आईची हाक कशी ऐकू नाही आली ? राहून राहून आम्हाला या गोष्टीचं आश्चर्य वाटत होतं. बराच अंधार पडला तसे आम्ही घरी जायला निघालो. घरी आल्यावर आईला म्हणालो, ''आई, अगं आज तू अभ्यासासाठी हाक कशी नाही मारलीस? आणि आज कुणाच्याच आईची हाक नाही ऐकू आली.''

त्यावर आई म्हणाली, ''अरे, म्हटलं खेळू द्यावं तुम्हाला. आता काय परीक्षा नाहीत ना,'' हे वा य आई म्हणाली आणि मला खूप आनंद झाला.

हुर्रेऽऽ आता परीक्षा नाही म्हणजे अभ्यासही नाही. अभ्यास नाही म्हणजे खेळ. खेळ आणि फ त खेळ. *येस!* आम्हा मित्रांना आता खेळण्यापासून कुणीच नाही थांबवणार. सगळे पास होणार. पुढच्या वर्गात जाणार! आता काय मज्जाच मज्जा, नुसती धमाल. शाळेत खेळ, घरी खेळ , दंगा-मस्ती, फुल टू धम्माल.

सुरुवातीचे ८-१० दिवस छान मज्जा आली. पण नंतर नंतर कंटाळा यायला लागला. सारखं तरी काय खेळायचं? अभ्यास नाही म्हणून काही वाचनपण नाही. कुणी दप्तराला हातसुद्धा लावला नव्हता इत या दिवसात. आता जर परीक्षाच नाहीत तर कोण कशाला अभ्यास करेल. एका संध्याकाळी आम्ही सगळे गप्पा मारत बसलो होतो. सगळ्यांच्या डो यात एकच विचार, 'परीक्षाच घेतल्या नाहीत तर अभ्यास कशाचा करायचा? आणि अभ्यास केला, नाही तर कळणार कसं आपल्याला काय समजलंय आणि काय नाही ते? पुढे मोठेपणी एकदम परीक्षा घेतल्या? तर आपल्याला जमणार का परीक्षा द्यायला? असे एक ना अनेक प्रश्न पडले.' बाप रे! नुसत्या विचारांनी अंगावर काटा आला.

मग आम्ही सगळ्यांनी आमच्या सोसायटीतल्या जोशी आजोबांकडे जायचं ठरवलं. आम्हाला पडलेले सर्व प्रश्न आम्ही त्यांना विचारले. त्यांनी तर आमच्यापुढे एक वेगळंच चित्र उभं केलं.

ते म्हणाले, ''अरे पोरांनो या परीक्षेचं काय घेऊन बसलात? यापेक्षा कितीतरी मोठ्या आणि अवघड परीक्षा द्यायच्यात तुम्हाला तुमच्यात आयुष्यात! अजून तुमचं शिक्षण, पुढे नोकरी त्याकरीता *इंटरव्ह्यू, प्रमोशनसाठी* परीक्षा.''

बापरेऽऽ भीतीच वाटायला लागली सगळं ऐकून. मग आतून जोशी आजी आल्या. त्या म्हणाल्या, ''अरे एवढंच नाही; पण आपण *फिट* आहोत की नाही ते बघायला ज्या *टेस्ट* कराव्या लागतात तीसुद्धा एक प्रकारची परीक्षाच असते. त्यातसुद्धा पास-नापास असतंच की! पुढे म्हणाल्या, ''अरे प्रत्यक्ष प्रभुरामचंद्रांच्या पत्नीला सीतेलासुद्धा अग्निपरीक्षा द्यावी लागली होती.''

काहीशा घाबरलेल्या अवस्थेतच मी घरी आलो. परीक्षा नाहीत म्हणून मी जेवढा सुखावलो होतो; त्यापेक्षा जास्त मी आता परीक्षा नाही म्हणून घाबरलो होतो. जोशी आजोबांनी सांगितल्याप्रमाणे पुढे या मोठमोठ्या परीक्षा द्यायच्या असतील, तर आताच्या परीक्षा द्यायलाच हव्यात. नाहीतर पुढची लढाई लढायला आमच्यात आत्मविश्वास कुठून येणार? विचार करतच झोपलो. दुसऱ्या दिवशी सकाळी उठून मनाशी ठरवून टाकलं की, परीक्षा असोत नाहीतर नसोत आपण अभ्यास करायचा, भरपूर वाचन करायचं आणि तयारी करायची ती एका वेगळ्याच परीक्षेची! एक चांगला माणूस होण्याची...


**- चि. अर्चित देवधर,** (इ. आठवी)

चंद्रगंगा, प्लॉट न. ५, कुलश्री कॉलनी, कर्वेनगर, पुणे 411052




**विरामचिन्हे किती बोलकी... शब्दांमधला अंतराय तो । उच्चारांच्या आत मिसळुनी, अर्थाला तो उचलून धरतो ।।**


**अभिमानास्पद : खेलरत्न पुरस्कार - सायना नेहवाल** - बॅडमिंटन (२००९-१०)

**प्रायोजक - श्री. चिंतामणी बने, डोंबिवली.**

मुलांचे पान

# अनोखे कास पठार



कास पुष्प पठाराविषयी बरंच काही ऐकलं होतं. म्हणून या पठाराचे सौंदर्य पाहण्यसाठी मी माझे आई-वडील व बहिण-भाऊ यांच्याबरोबर गेले होते. सप्टेंबर ते ऑ टोबर महिन्याच्या शेवटपर्यंतचा काळ कास पठारावर जाण्यासाठी उत्तम असतो. म्हणून आम्ही सप्टेबरच्या सुरुवातीला जायचं ठरवलं. सकाळी ६ वाजता आमचा पुण्याहून साताऱ्याला जाण्याचा प्रवास सुरू झाला. साधारणत: साडेनऊ वाजता आम्ही साताऱ्याला पोहोचलो. तिथून कास पठार २९ कि.मी. अंतरावर होते. रस्त्याच्या दुतर्फा असलेले निसर्गसौंदर्य डोळ्यांत साठवत आम्ही चाललो होतो.

कासकडे जाताना सुरुवातीला 'यवतेश्वर' पठार लागते. तिथे पिवळ्या रंगाची 'स्मिटिया' (मिकीमाऊसची फुले) नावाची फुलं होती. ती बघितल्यावर जणू पिवळा गालीचा पसरला आहे असंच वाटलं. पारंबे गाव सोडल्यावर आम्ही कासपठारावर आलो. नंदनवनच म्हणावं ते ! सुदैवानं वातावरण ढगाळलेलं असूनही पाऊस पडत नसल्यानं ते वातावरण फिरण्यासाठी अनुकूल होतं. हा भाग सरकारनं सुरक्षित भाग म्हणून जाहीर केला आहे. 'फुलांवरून चालू नये, कोणतेही झाड तोडू नये व पठारावर कचरा करू नये,' असं सांगण्यात येत होतं. रस्त्याच्या दुतर्फा 'दहिभाताची फुलं' (पांढऱ्या रंगाची) उमललेली होती. पठारावर कीटकभक्षी वनस्पती यट्री यालेरीया (सीतेची आसवं), गेंद, विविध रंगाची रानतेरड्यांची फुले, मुरडानिया, अबोलिना, दीपकांडी. अग्निशीखा अशी विविध फुले डोलत होती.

कासपठाराचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे 'टोपली कारवी' हे झाड. या झाडाला आता यंदाच्यावर्षी फुले येणार आहेत. आश्चर्य म्हणजे काही झाडांवर ही जांभळ्या रंगाची फुले थोड्याफार प्रमाणात फुललेली आम्हाला दिसली. कास पठारावर कीटकांपासून फुलांपर्यंत खूप विविधता आहे. येथे खूप प्रकारच्या रंगीबेरंगी आकर्षक आळ्या आहेत. यावरून आपण येथील जैव विविधतेचा अंदाज लावू शकतो. मस्त मजा करत, फोटो काढत आम्ही या सहलीचा आनंद घेत होतो. पण पर्यटकांना स त ताकीद देऊनही काही पर्यटक फुलांवरून चालत होते. त्याची खंत मनात वाटत होती.

नंतर कास तलावापासून साधारण १२ किमीवर असलेले 'बामणोली' हे गाव पाहण्यासाठी आम्ही निघालो. जाताना आम्हाला काही धबधबे दिसले. हे धबधबे कास पठाराच्या सौंदर्यात आणखी भर घालत होते. जाताना आम्ही घाटातून गेलो. तेथून बामणोलीचे दृश्य अधिक मनोहर दिसत होते. 'बामणोली' हे कोयना धरणाच्या 'शिवसागर' जलाशयाच्या काठी वसलेले खूप लहान खेडेगाव आहे. आजूबाजूचा मोहून टाकणारा हिरवागार निसर्ग, पाण्यावर डोलणाऱ्या नावा हे दृश्य खूपच मनमोहक होते. हे सौंदर्य डोळ्यांत साठवून आम्ही परतीच्या प्रवासाला निघालो.

घरी परत येत असताना मनात एकच विचार येत होता; 'शहरातील रोजचाच गोंगाट, प्रदूषण, ताणतणाव यातून विरंगुळा म्हणून एकदा तरी फुलांसाठी प्रसिद्ध असलेल्या या कास पठाराला भेट द्यावी ! आणि त्या फुलांप्रमाणे ताजे, टवटवीत, निर्मळ व्हावे.

* *

**– कु. ऐश्वर्या पठारे,** इ.९ वी, आपटे प्रशाला, पुणे

अरण्यावाचन करता करता, उरले नाही भान। शब्दांमध्ये मावत नव्हते असे वेचले ज्ञान।।



अभिमानास्पद : खेलरत्न पुरस्कार – गगन नारंग – तिरंदाजी (२०१०–११)
प्रायोजक – सौ. प्राची अमर परांजपे, सांगली.

# नावातील गमती-जमती



**चिंच –** चिंच कोणाला आवडत नाही? विशेषत: बालवयात झाडावर चढून किंवा जमिनीवरून दगड मारून पाडलेल्या गाभुळलेल्या चिंचा जवळजवळ प्रत्येकाला आठवत असतील. इंग्रजीत चिंचेला *Tamarind* असे म्हणतात. *Tamarind* हा शब्द 'तमर-इ-हिंद' या अरबी शब्दावरून आलेला आहे. खरं तर 'तमर' म्हणजे अरबी भाषेत 'खजूर'. पण भारतात चिंच आयात झाल्यानंतर त्याला वेगळं नाव न सुचल्यानं, भारतातील खजूरवजा फळ अर्थात् 'तमर-इ-हिंद' असं नाव देण्यात आलं. नंतर इंग्रजांनी हा शब्द मात्र, अरबी भाषेतून 'आयात' करून त्याला *Tamarind* असं सुटसुटीत नाव दिलं ! चिंच मूळची सुदान या आफ्रिकेतील देशातून हजारो वर्षांपूर्वी भारतात आली आणि इथं तिचा एक फळ म्हणून विकास करण्यात आला. तिच्या शेकडो जाती आणि उपजाती तयार करण्यात आल्या. मराठीत मात्र, 'चिंच' हा शब्द बहुधा तेलगू 'चिंतचेट्टु' या शब्दापासून आला असावा.

---



**मिरची –** 'मिरिक' या संस्कृत शब्दावरून कदाचित मिरची आणि मिर्च हे शब्द अनुक्रमे मराठी आणि हिंदी भाषांमध्ये आलेले असावेत. मिरे सदृश्य यामुळेही मिरची असं रूप आलं असण्याची श यता आहे. 'पिप्पली' या संस्कृत शब्दाचा अर्थ मिरे असा आहे. त्यापासूनच इंग्रजीत *Pepper* हा शब्द आला आहे. मिरे हे फार पूर्वीपासून भारतात उपलब्ध होते; पण मिरची मात्र मे सिकोमधून स्पेन आणि तेथून भारतात आली असावी. *Chili Pepper* म्हणजे इंग्रजीमध्ये मिरची. मिरीप्रमाणे तिखट असल्याने *Pepper* हा शब्द *Chili* या शब्दाला जोडला गेला. पण मुळात *Chili* हा शब्द मात्र मे सिकोमधील एतद्देशीय भाषेमधून आलेला आहे.



---



**आंबा –** 'आंबा' हा शब्द संस्कृत 'आम्र' या शब्दापासून आला आहे. *Mangifera Indica* हे आंब्याच्या झाडाचं शास्त्रीय नाव. आंबा हे भारत, पाकिस्तान आणि फिलिपाईन्स या देशांचं राष्ट्रीय फळ आहे. पण या फळाचं मूळ दक्षिण भारतात आहे. तमिळ शब्द 'मंगाइ' यावरूनच इंग्रजी आणि इतर युरोपियन भाषांत *Mango* हे रूप तयार झालं. पोर्तुगीजांना हे फळ विशेष आवडलं आणि त्यांनी गोव्यात आणि कोकणात त्याच्या उच्च जाती निर्माण केल्या. 'अल्फान्सो' या पोर्तुगीज साहेबानं केलेल्या जातीला 'अल्फान्सो' किंवा त्याच्या 'हापूस' या अपभ्रष्ट नावानं ओळखलं जातं. 'परेरा' नावाच्या दुसऱ्या पोर्तुगीज साहेबानं तयार केलेल्या जातीला 'पायरी' या अपभ्रष्ट नावानं संबोधलं जातं. आहे की नाही गंमत !

– **श्रीनिवास शारंगपाणी**, ७१४/१, नारायण पेठ, लक्ष्मी रस्ता, पुणे 411030

**अशाच काही नावाच्या गमती-जमती, त्यामागील रंजक इतिहास तुम्हालाही माहीत असेल तर 'छात्र प्रबोधन'कडे पाठवा. वैशिष्ट्यपूर्ण माहितीला प्रसिद्धी मिळेल.**

छात्र प्रबोधनच्या सौर श्रावण (ऑगस्ट २०१४) च्या अंकात पान क्र. २० वरील भास्कराचार्यांच्या लीलावतीमधील कूटप्रश्न क्र. २ दिला होता तो असा – *कमळांच्या राशीत काही कमळे होती. त्यातील एक तृतीयांश शंकरास वाहिली, एक पंचमांश कमळे विष्णूस वाहिली, एक षष्ठांश सूर्यास वाहिली, एक चतुर्थांश देवीस अर्पण केली व राहिलेल्या ६ कमळांनी गुरुचरणांची पूजा केली तर कमळे किती होती, ते झटकन सांगा.* तुम्ही सोडवला का हा प्रश्न? सोडवण्याची भास्कराचार्यांची रीत (इष्ट कर्म) पुढे दिली आहे.तुमच्या रीतीशी ती ताडून पाहा.

उत्तर – सुरुवातीला असलेल्या कमळांची संख्या म्हणजे 'मूळ संख्या' होय. त्याऐवजी प्रथम एखादी संख्या मनात धरून तिच्यावर दिलेल्या क्रिया कराव्यात. त्या संख्येला 'इष्ट संख्या' म्हणावे.

समजा कमळांची संख्या १ धरली, तर इष्ट संख्या = १

शंकरास वाहिलेली कमळे $१ \times \frac{१}{३} = \frac{१}{३}$ सूर्यास वाहिलेली कमळे $१ \times \frac{१}{६} = \frac{१}{६}$

विष्णूला वाहिलेली कमळे $१ \times \frac{१}{५} = \frac{१}{५}$ देवीस वाहिलेली कमळे $१ \times \frac{१}{४} = \frac{१}{४}$

दिलेल्या माहितीवरून सर्व क्रिया करून उरलेल्या कमळांची संख्या म्हणजे फळ

$$\therefore \text{फळ} = \left[१ - \left(\frac{१}{३} + \frac{१}{५} + \frac{१}{६} + \frac{१}{४}\right)\right] = \left[१ - \frac{४० + २४ + २० + ३०}{१२०}\right]$$

$$\text{फळ} = १ - \frac{११४}{१२०} = \frac{६}{१२०} = \frac{१}{२०}$$

राहिलेल्या कमळांची संख्या = दृश्य संख्या = ६

भास्कराचार्यांनी दिलेले सूत्र – **फळ × मूळ संख्या = इष्ट संख्या × दृश्य संख्या**


$$\text{सूत्रानुसार} \quad \frac{१}{२०} \times \text{मूळ संख्या} = १ \times ६ \Longrightarrow \text{मूळ संख्या} = ६ \times \frac{२०}{१} = १२०$$

इष्ट संख्या आपण १ ऐवजी कोणतीही घेऊ शकतो.

उदा. १ च्या ऐवजी ६ ही इष्ट संख्या धरून दिलेला कूटप्रश्न सोडवून उत्तर तेच येते का, त्याचा पडताळा घ्या.

आपण अशा प्रकारचे प्रश्न 'क्ष' ही सामान्य संख्या मानून सोडवतो.

**सोडवा पाहू कूटप्रश्न – क्र. ३ :** *सोबतच्या आकृतीत ४ एकरूप काटकोन त्रिकोणांची एक रचना दिलेली आहे. त्यापैकी Δअयब ह्या काटकोन त्रिकोणाचा कर्ण अब= म एकक, काटकोन करणाऱ्या बाजू भूज अय = प एकक आणि कोटी बय= फ एकक. ह्या आकृतीतील वैशिष्ट्यपूर्ण रचनेचा वापर करून भूज $^२$ + कोटी $^२$ = कर्ण$^२$ म्हणजे प $^२$ + फ$^२$ = म $^२$ सिद्ध करा.*




भास्कराचार्यांनी दिलेल्या कूटप्रश्न सोडवण्याच्या रीतीचे मराठी स्पष्टीकरण – **किरण बर्वे**

रमा, १६ ब, गल्ली क्र. ९, शिक्षकनगर, कोथरुड, पुणे – ३८



जीवनावरी 'मन रंगा'ची चला रंगवू नक्षी। साकारूया समृद्धीचे स्वप्न छान गुलबक्षी।।



अभिमानास्पद : खेलरत्न पुरस्कार – योगेश्वर दत्त – कुस्ती (२०११-१२)

**सहभागी व्हा ! मुलींसाठी - क्रीडा दले, विज्ञान दल -** युवती विभाग, ज्ञान प्रबोधिनी, पुणे - मेधाविनी ☎ ९४२३११६२१३४

# ‘छात्र प्रबोधन’ – वर्ष चौदा : अंकातील विशेष लक्षवेधी

**सौर अश्विन शके १९३५ ते सौर भाद्रपद शके १९३६ (इ.स. २०१३ – २०१४)**

| आढावा : संख्यात्मक सारणी (वर्षभरात येऊन गेलेले एकूण साहित्य) | | | |
|---|---|---|---|
| कथा – २० | व्यक्तिपरिचय– ३ | संस्था परिचय – २ | **लेखक – ८५** |
| कविता – २४ | भटकंती – ४ | विशेष लेख – २ | **कवी – २०** |
| ललित – २५ | जरूर वाचा/पाहा – ७ | लेखमाला– ४ | **चित्रकार – १८** |
| माहितीपर – १८ | प्रासंगिक – १ | (एकूण लेख–२३ ) | **एकूण पृष्ठे – ५२४** |
| कृतिपर–वि./क./प्र.- २३ | सर्वांगीण विकसन – १ | अभ्यासाला पूरक साहित्य – ३ | |

**दिवाळी अंक** ‘छात्र प्रबोधन’तर्फे यावर्षी कुमार वयोगटातील मुलामुलींसाठी मराठी, इंग्रजी व ग्रामीण असे तीन स्वतंत्र दिवाळी अंक तर युवक–युवतींसाठी ‘युवोन्मेष’हा अंक प्रकाशित करण्यात आला. याशिवाय चारही अंकांची एकत्रित संगणकीय आवृत्तीही (पीडीएफ स्वरूपात सीडी) प्रकाशित करण्यात आली. यात मराठी २५,०००, इंग्रजी ७,०००, ग्रामीण १३,०००, युवोन्मेष ४,०००, संगणकीय पीडीएफ अंक ६०० असा एकत्रित प्रकाशनपूर्व नोंदणीचा टप्पा ५०,००० च्या वर गेला. तसेच अंध मित्रांसाठी यावर्षीही मराठी अंकाचे ब्रेल लिपीतले रूपांतर प्रकाशित करण्यात आले.

**लेखमाला** • **‘गणिती खुराक– जादूचे चौकोन’** या लेखमालेतून गणिताची गोडी व गणिताचे स्वयंअध्ययन कसे करावे, हे जादूचे चौकोन तयार करण्याच्या विविध पद्धतीतून मांडले आहे.:– *अंक २ ते अंक ६*– लेखिका **–डॉ. वर्षा जोशी** • **विज्ञान तंत्रज्ञानातील कल्पकता –** विज्ञान तंत्रज्ञानातील तुमच्या कल्पकतेला धुमारे फुटण्यासाठी – *अंक १, ४. जादुई रूपांतरण. ५. घटकांची जुळणी करून नवनिर्मिती ६. सिनेक्टिक्स ७. सक्तीची जोडणी ९. समस्या परिहार* लेखिका – **डॉ. नलिनी गुजराथी**

• **संवाद कौशल्य –** विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्त्व विकसन करणारी, नेतृत्वगुण विकसनासाठी उपयुक्त असे संवाद कौशल्य वाढविण्यासाठी. *अंक २. संवादाचा धागा, गटात संवाद साधताना, स्वसंवाद, मौन संवाद, संभाषणातील वाद, हरवलेला संवाद (कविता) ३. औपचारिक संवादाची पूर्वतयारी ४. वक्तृत्व कौशल्य ५. कसे बोलाल मोबाईलवर? ६. गटचर्चा ७. मुलाखत ८. अर्थपूर्ण संवादासाठी ९,११. संवादात देहबोलीचे महत्त्व भाग १ व २. १२. संवादातील अडथळे* लेखक – **प्रीती जोग, विजय जोशी, क्षितिज देसाई, आदित्य शिंदे, डॉ. सुचरिता गद्रे, एकनाथ आव्हाड, स्मिता निरगुडकर, डॉ. नलिनी गुजराथी, आश्लेषा महाजन, महेन्द्र सेठिया, स्वप्नीला सेठिया**

**‘संवादातून’ केलेली कृतिपर आवाहने** **अंक १** – १) देवीच्या विविध रूपांबद्दल पुराणकाळातल्या कथा वाचून त्यातील रूपकात्मकता व प्रतिकांचा अर्थ समजून घेण्याचा प्रयत्न करा. **अंक २** – शालेय वयापासून स्वत:ला ओळखण्यासाठी, तपासण्यासाठी, ताणण्यासाठी आणि पूर्णार्थाने व्यक्त होण्यासाठी छोटी–मोठी आव्हाने तुम्ही स्वीकारावीत व जिद्दीने त्यात यशस्वी व्हावे. **अंक ३** – कुमारांच्या ‘छात्र प्रबोधन’कडून काय अपेक्षा आहेत? थोडा वेळ काढून, आवश्यकता वाटली तर मागचे अंक चाळून, तुम्ही याविषयी लिहायचा प्रयत्न करा आणि आमच्यापर्यंत पोहोचवा. **अंक ४** – थोडा आळस झटकून, स्वत:च्या क्षमता ओळखून, काहीतरी विशेष करण्याची तुमच्यातली ऊर्मी जागी करा. **अंक ५** – ‘आमच्या प्रतिभेने आम्ही विज्ञान–तंत्रज्ञानाच्या अथांग सागरात लाटा निर्माण करू’, असा ध्यास मनात बाळगा. त्याला मेहनतीची जोड द्या. **अंक ६** – ‘सर्वांसाठी शिक्षण’ हे शासनाचे उद्दिष्ट, तर ‘गुणवत्तापूर्ण शिक्षण’ हे तुमचं तुमच्या वर्गाचं उद्दिष्ट असायला हवं! **अंक ७** – या सुट्टीत स्वत:च्या कष्टातून (कोणीतरी भेट



**झुळझुळ झुळझुळ वाहती वारे, वाऱ्याच्या संगती वही थरारे। वहीत शब्दांना फुटती पंख, पंखांना अर्थांचे रुपेरी वर्ख ।।**

**अभिमानास्पद : खेलरत्न पुरस्कार – रंजन सोढी** – तिरंदाजी (२०१२–१३)



**नागरीवस्त्यांमधील किशोरींसाठी उपक्रम** - नागरीवस्ती अभ्यासगट, ज्ञान प्रबोधिनी, पुणे - हर्षाताई ☎ ९३२५२७२३३७

दिलेले, आई-वडिलांकडून मागितलेले नाही) तुम्ही १०० रुपये कमवावेत अन् गारपीटग्रस्त भागातील प्रचंड नुकसानीला सामोरं जाव्या लागलेल्या सर्वात जास्त गरजू कुटुंबांना शैक्षणिक मदत करण्यासाठी 'मे'अखेरपर्यंत 'छात्र प्रबोधन'कडे पाठवावेत. **अंक ८** – तंत्रज्ञानावर हुकमत गाजवता तर यायलाच हवी; पण त्याचबरोबर ते सहजपणे बाजूला ठेवून, एखाद्या गोष्टीत तल्लीन होऊन, उत्कटपणे ती गोष्ट सर्वांगांनी (शरीर-मन-बुद्धी-भावना) अनुभवा. **अंक ९**- दैनंदिन शालेय अभ्यास करता करता आजूबाजूच्या घडामोडी, देशप्रश्न समजून घ्यायचा प्रयत्न करा. त्यावरच्या उत्तरांची माहिती घ्या. शारीरिक-बौद्धिक-मानसिक क्षमता-कौशल्ये वाढवायचा जाणीवपूर्वक प्रयत्न करा. या देशाची मान शरमेनं खाली जाईल असं कोणतंही कृत्य (बेशिस्तीचे वर्तन, अस्वच्छता, सार्वजनिक मालमत्तेची नासधूस, पर्यावरणाला हानीकारक गोष्टी, राष्ट्रीय सन्मानाच्या गोष्टींचा अनादर, छोट्या-मोठ्या गोष्टीतील भ्रष्टाचार, दुसऱ्यांवर अन्याय इ.) तुमच्या हातून घडू देऊ नका. **अंक ११** – शेतात काम करण्याचा अनुभव घ्या. त्याचबरोबर तुम्ही शेतकऱ्यांशी गप्पा मारा. त्यांची सुख-दु:ख समजून घ्या. त्यांच्या अडचणी-प्रश्न जाणून घ्या. यावर्षी तुमच्या शाळेतील १५ ऑगस्ट, गणेशोत्सव कार्यक्रमांना काय-काय कल्पक, अर्थपूर्ण पर्याय तुम्ही देऊ शकाल? कोणत्या निराळ्या पद्धतीने हे कार्यक्रम तुम्ही साजरे करू शकाल त्यावर विचार करून तशी कृती करा. **अंक १२** – तंत्रज्ञानाचा योग्य वापर तुम्ही करा आणि ग्रामीण व वंचित घटकांमधील विद्यार्थ्यांनाही तंत्रज्ञानात पारंगत करण्यासाठी ठोस कृती करा.

**लेखांखालील कृती** **अंक १** – '*सखी* होणार ना निर्भय?' या लेखामधे ज्या कवींच्या कविता दिल्या आहेत, त्यांचे काव्यसंग्रह संदर्भासाठी लेखाखाली दिले आहेत. यापैकी कुठल्या कविता तुम्ही शोधल्या, आमच्याकडे पाठवा. **अंक ३** उत्तम संवाद साधण्याची तयारी होण्यासाठी संवाद कौशल्य या लेखाखाली दिलेली प्रश्नावली तुम्ही सोडवा. **अंक ४**- 'मानव मु तीचा महानेता – नेल्सन मंडेला' या लेखाखाली दिलेल्या पुस्तकांमधील पुस्तके वाचा. **अंक ५**- १) 'खुजाबा' या कथेवरील प्रश्नांची उत्तरे लिहून पाठवा. **अंक ६**- 'स्त्री शिक्षणाचे शिल्पकार महर्षी धोंडो केशव कर्वे' या लेखाखाली दिलेले पुस्तक आवर्जून वाचा. **अंक ७**- १) 'मुलाखत – एक संवाद!' या लेखात सांगितलेली मुलाखतीची तंत्रे वापरून लेखाखाली दिलेल्या कोणत्याही एका व्य तीची तुम्ही मुलाखत घ्या. २) या अंकापासून 'प्रतिसादी वाचकवीर व्हा...' ही प्रश्नावली सुरू केली आहे. ती सोडवून पाठवणे. **अंक ९** – १) 'देणाऱ्या हातांचा गोफ' या लेखाखाली गरीब गरजू विद्यार्थ्यांसाठी जुनी पुस्तकं – गणवेश किंवा नवीन पुस्तके खरेदी करून देण्याचा संकल्प करणे. **अंक ९, ११,१२** – 'गणितज्ञ भास्कराचार्य' या लेखाखाली दिलेले कूटप्रश्न सोडवणे.
**अंक १, ७, ९** – 'विज्ञान तंत्रज्ञानातील कल्पकता' या लेखमालेखाली दिलेले कृतिपाठ करून पाहा.

**तळटिपा** • एक विशिष्ट सूत्र डोळ्यासमोर ठेवून अंकात पानाखालील माहितीपर ओळी दिल्या गेल्या. त्या ओळींचा वापर मुलांना व तृत्व, प्रकल्प, निबंधलेखन व त्या-त्या विषयांचे एकत्रित संकलन म्हणून करता येऊ शकेल.
**अंक १**–विविध ३३ भाषा व १८ लिपींमधील रामायणांचा तपशील. **अंक ३**– भारतीय अवकाश संशोधन संस्था व त्यांच्यातर्फे झालेल्या यान व उपग्रह प्रक्षेपणासंदर्भात... **अंक ४** – भारतातील 'सर्वोच्च', सर्वात 'मोठे', 'उंच' व 'लांब' याविषयी. **अंक ५** – इ. स. १८५० नंतर जन्मलेले काही भारतीय शास्त्रज्ञ व त्यांची अभ्यास क्षेत्रे **अंक ६**– विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य केलेल्या भारतीय महिला. **अंक ७**– महाराष्ट्राव्यतिरि त इतर राज्यातील सांस्कृतिक उत्सव **अंक ८**– भारतातील अभयारण्ये **अंक ९** – भारतातील काही वैशिष्ट्यपूर्ण स्थापत्य, वास्तू व शिल्पांविषयी. **अंक ११**– भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील क्रांतिकारकांविषयी. **अंक १२**– खेलरत्न पुरस्कार विजेत्या खेळाडूंविषयी
• याशिवाय पानांखालील कवितेच्या ओळी निसर्ग, विज्ञान, विविध ऋतूंशी व आशयाशी सुसंगत विषयांच्या होत्या.

ध्यानी मनी जिथे तिथे, अभ्यासाचा ध्यास। स्वप्नात सुद्धा येतो, मला पुस्तकांचा वास॥


जरूर वाचा : जिद्दीची लोभस रूपं – अनुभवपर प्रेरणादायी पुस्तक – छात्र प्रबोधन प्रकाशन – मूल्य ₹ ६०
कालोचित, अर्थपूर्ण संस्कारांसाठी - पौरोहित्य विभाग, संत्रिका, ज्ञान प्रबोधिनी, पुणे ☎ २४२०७१४७

## ‘छात्र प्रबोधन’ च्या सभासद–वाचकांसाठी आयोजित स्पर्धा, उपक्रम व मेळावे यांचा आढावा.

**१. हस्तलिखित स्पर्धा -** ‘तुम्हीच संपादक व्हा’ या हस्तलिखित स्पर्धेचे हे **१६** वे वर्ष. यावर्षी हस्तलिखितासाठी प्रतिभाशाली लेखन, मुलाखत, वर्ष विशेष, एकांकिका, कल्पक विचार असे काही विषय दिले होते व निम्मा अंक मुलांनी कोणत्याही एका विषयावर तयार करायचा होता. यावर्षी या स्पर्धेमध्ये महाराष्ट्रातील १६ गावांमधील २३ शाळा व ४ स्वतंत्र गटांमधील ३३ संघांनी भाग घेतला. त्यात सुमारे ३०० विद्यार्थी सहभागी झाले होते. विजेत्या संघांना एकूण ५,००० रु. किंमतीची पुस्तके व प्रशस्तिपत्रके बक्षीस म्हणून दिली गेली.

**२. पीपीटी स्पर्धा –** आपल्या गावाचा इतिहास, भूगोल, निसर्ग, माणसे, लोकजीवन, दर्शनीय स्थळे अशा अनेक वैशिष्ट्यपूर्ण गोष्टी दाखवणारा माझा गाव/शहर या विषयावर स्लाईड शो (पीपीटी) बनवून पाठवण्याची ही सांघिक स्पर्धा होती. यात ५ गावातील १४ संघांनी भाग घेतला होता.

**३. समूहगायन स्पर्धा –** भारतीय भाषांमधील राष्ट्रभ तीपर गीतांची समूहगायन स्पर्धा आयोजित केली होती. ५ शाळांच्या संघांनी या गीतगायनाचे व्हिडीओ रेकॉर्डिंग करून त्याची सीडी पाठविली होती. बंगाली, कन्नड, गुजराथी, राजस्थानी व तमिळ या भाषांमधील राष्ट्रभ तीपर गीतांचे गायन त्यासोबत त्या गीताचा अर्थ व त्याचे रसग्रहणही त्यांनी पाठविले.

**२. उपक्रम : १. जोडीकार्य –** मागील वर्षीप्रमाणे यंदाही छात्र प्रबोधनतर्फे जोडीकार्य हा ‘दूरस्थ अनुभव’ उपक्रम राबविण्यात आला. त्यात इंदापूर, चिपळूण, धुळे, पुणे येथील १० जोड्यांनी भाग घेतला होता. जोडीकार्यातील त्यांना नेमून दिलेली कामे यशस्वीरित्या पूर्ण केली. अशा प्रकारची कामे देण्यामागे मुलांमधला आत्मविश्वास वाढावा, व्यावहारिक कौशल्ये त्यांना समजावीत, आपल्याच अंगचे सुप्त गुण त्यांना कळावेत व समाज परिस्थितीचे भान त्यांना यावे हे या उपक्रमाचे हेतू होते. मुलांशी झालेल्या संभाषणातून काही प्रमाणात तरी हे हेतू सफल झाले आहेत हे लक्षात आले.

**२. अभिवाचन शिबिर –** सौर ९ ते ११ ज्येष्ठ (३०–३१ मे व १ जून २०१४) रोजी छात्र प्रबोधनतर्फे सातवी ते दहावी या गटासाठी अभिव्य ती शिबिर आयोजित केले गेले. इ. ७ वी ते १० वी या गटातील १० विद्यार्थ्यांचा यामध्ये सहभाग होता. अभिवाचन म्हणजे काय? अभिवाचन करताना त्याची शब्दफेक कशी असावी याबाबत मा. अंजली कुलकर्णी व आकाशवाणी निवेदक प्रसाद कुलकर्णी यांनी सत्रे घेतली. कवितेचे सादरीकरण कसे करावे? याबाबत आश्लेषा महाजन, मीरा शिंदे, मृणालिनी कानिटकर यांनी हे सत्र घेतले. समारोपाच्या दिवशी मुलांनी ‘निसर्ग’ आणि ‘सुट्टी’ या सूत्राभोवती छात्र प्रबोधनच्या अंकातील साहित्यावर आधारित अभिवाचनाचा कार्यक्रम सादर केला. या सादरीकरणाला २५ ते ३० पालक उपस्थित होते.

**३. कार्यानुभव –** ‘छात्र प्रबोधन’च्या कार्यालयात या आणि कामातील मजा अनुभवा’ या आवाहनाला प्रतिसाद म्हणून दि. ५ ते १५ मे २०१४च्या दरम्यान अनुभवी व्य तींबरोबर काम करण्याचा, निरीक्षणातून नवीन काही शिकण्याचा अनुभव घेण्यासाठी इ. दहावीचे सुमारे १० ते १२ विद्यार्थी सहभागी झाले होते. सहभागी विद्यार्थ्यांचा कौतुक समारंभ करून कार्यानुभव उपक्रमाची सांगता झाली.

**४. प्रबोधन तासिका –** ‘छात्र प्रबोधन’च्या अंकातील साहित्यावर आधारित पुण्यातील तीन शाळा तर ग्रामीण भागातील चार शाळांमध्ये जुलै २०१३ पासून नियमितपणे साप्ताहिक प्रबोधन तासिका घेण्यात आल्या. किमान ६ तास तर कमाल २४ तास इत या तासिका या शाळांमध्ये इयत्ता ७ वी/८ वीच्या वर्गांवर घेण्यात आल्या. तासिका घेऊ इच्छिणाऱ्या सदस्यांसाठी एक दिवसाचा प्रशिक्षण कार्यक्रम झाला.

**३. दिवाळी अंकांवर आधारित मेळावे-** दरवर्षी प्रमाणे याही वर्षी छात्र प्रबोधनच्या दिवाळी अंकांवर आधारित २३ मेळावे घेण्यात आले. या मेळाव्यांमध्ये मौनवाचन, प्रकटवाचन, सादरीकरण, कलाकौशल्य, लेखकांशी दूरभाष इ. उपक्रमांचा समावेश केला होता. इ. ५ वी ते ९ वीतील एकूण १३०० विद्यार्थी सहभागी झाले.



अभ्यासामध्येच, रमो माझे मन। देई वरदान, एवढे गा...।।

जरूर वाचा : आयुष्यातील वादळलाटा – अनुभवपर प्रेरणादायी पुस्तक – छात्र प्रबोधन प्रकाशन – मूल्य ₹ ७०



महाविद्यालयी विद्यार्थ्यांसाठी प्रिपरेटरी व फाउंडेशन कोर्स - नेतृत्व संवर्धन केंद्र, ज्ञान प्रबोधिनी ☎ २४२०७१७४

## छात्र प्रबोधन दिवाळी अंक २०१४-प्रकाशनपूर्व नोंदणीसाठी आवाहन

**प्रिय प्रबोधक,**

'छात्र प्रबोधन'च्या दिवाळी अंकाची तुम्ही आणि सारा महाराष्ट्र आतुरतेनं वाट बघत असतो. मागील वर्षी मराठी दिवाळी अंकाला महाराष्ट्र साहित्य परिषद' पुणे व जुळे सोलापूर यांचे विशेष पुरस्कार मिळाले आहेत. अत्यंत दर्जेदार असा आपला यावर्षीचा दिवाळी अंक तयार होतो आहे. कोणतेही कमिशन न घेता, स्वयंसेवी वृत्तीने महाराष्ट्र व गोव्यात गावोगावचे कार्यकर्ते अत्यंत मन:पूर्वक आपल्यापर्यंत हा अंक पोहोचावा म्हणून काम करीत असतात.

खालील शहरांत/गावांत छात्र प्रबोधनच्या दिवाळी अंकांच्या नोंदणी व वितरणाचे काम करणारे काका–काकू किंवा ताई–दादा आहेत. **त्यांच्याकडे जाऊन तुम्ही तुमचा दिवाळी अंक १५ ऑ टोबरनंतर घेऊन जावा.** यावर्षी दिवाळी अंकाच्या जास्तीत जास्त नोंदणीसाठी तुम्हीही त्यांच्याबरोबर सहभागी होणार ना? छात्र प्रबोधनचा दिवाळी अंक आपल्या अनेक मित्र–मैत्रिणींना सवलतीच्या दरात नोंदवायला सांगा. तसेच इतरही अंकांची नोंदणी तुमच्यासाठी व तुमच्या परिचयातल्या व्य तींसाठी आवर्जून करा. दिवाळी अंकाचे प्रचार साहित्य (हस्तपत्रके, भित्तीपत्रके) खालील केंद्रांवर उपलब्ध आहे. तुम्ही त्याचाही उपयोग करून तुमच्या शाळेत व परिसरात नोंदणी करू शकता. प्रकाशनपूर्व नोंदणीचा अंतिम दिनांक **१५ सप्टेंबर २०१४.**

तसेच छात्र प्रबोधनद्वारा प्रकाशित पुस्तकांचीही नोंदणी खालील केंद्रांवर करा. (सूची या आधीच्या अंकाच्या मलपृष्ठाच्या आतील पानावर दिली आहे.)

ज्या गावांमध्ये वितरण केंद्रे नाहीत, त्या गावांमधील सभासदांना साध्या पोस्टाने अंक पाठविले जातील. अंक न मिळाल्यास वेगळा अंक पाठवला जाणार नाही. खात्रीशीरपणे दिवाळी अंक मिळण्यासाठी **रु. ४०/–** जादा पाठवावेत. त्या सर्वांना कुरिअर/रजिस्टर्ड पोस्टाने अंक पाठवले जातील.

**– संपादक, छात्र प्रबोधन**

### – दिवाळी विशेषांकांची प्रकाशनपूर्व नोंदणी किंमत –

| नित्य मासिकाचा दिवाळी अंक ₹ ४० | इंग्रजी ₹ ४० | ग्रामीण ₹ ३० | युवोन्मेष ₹ ४० | बोलका अंक सी.डी. ₹ ५० | चारही अंकांचा एकत्रित संगणकीय (Pdf) अंक सी.डी. ₹ ५० |
|---|---|---|---|---|---|

**प्रकाशनपूर्व सवलतीतील नोंदणीचा अंतिम दिनांक १५ सप्टेंबर २०१४**

## छात्र प्रबोधन दिवाळी अंक वितरण व नोंदणी केंद्रे

### विभाग १. बोरीवली (प. मुंबई)

बोरीवली - सौ. सुमिता पांढरे ☎ ९९६९०५१५७३
विलेपार्ले - श्री. दत्तात्रय जोशी ☎ ९८६९०६३७७२
बांद्रा - श्री. मिलिंद चिंदरकर ☎ ९३२२२४२५६९
गिरगाव - श्रीमती शिरीषा खरे ☎ २२-२३८८६९३५
चेंबूर - कु. मधुरा पंडित ☎ ९८६९४५०००१
विरार-वसई- श्री. फ्रान्सिस डिमेलो ☎ ९८५०१८२६६१
पालघर - श्री. तुषार राऊत ☎ ९८६०२०३१००
दादर - श्री. सतीश पै ☎ ९८२०२६७३२७

### विभाग २. डोंबिवली (मध्य मुंबई, ठाणे)

ठाणे - सौ. सुप्रिया बर्वे ☎ ९८६९११५०४१
डोंबिवली - श्रीमती दीपाली हिंगणे ☎ ९९३०३४३८२२
कल्याण - सौ. स्मिता मनोरे ☎ ९९२०९४८७७८
अंबरनाथ - सौ. अश्विनी कुलकर्णी ☎ २५१-२६०१४११
बदलापूर - श्रीमती कुमुद पटवर्धन ☎ ८००७०५९९३५

### विभाग ३. अलिबाग (रायगड, नवी मुंबई)

अलिबाग - श्री.राम जोशी ☎ ९४२०८३५६५०
नागाव - सौ. स्नेहा जोशी ☎ २१४१-२४५६६१
नागोठणे - सौ. सुलभा गोखले ☎ २१९४-२७७९०३
मुरुड - सौ. दीपाली जोशी ☎ ९९६०८६६१७७
देवगड - श्री. जयेश खाडिलकर ☎ ९४०३५९५१७५
महाड - श्री. डी. एस्. सावंत ☎ ९८२२६२६९३२

**माझी साळा हाये बग लई लई लांब। वाडीच्या पल्याड जिथं डोंगरांची रांग।।**



**जरूर वाचा : आम्ही असे घडलो** – अनुभवपर प्रेरणादायी पुस्तक – छात्र प्रबोधन प्रकाशन – **मूल्य ₹ ८०**

**NTS मार्गदर्शन, विविध कौशल्यांचे प्रशिक्षण** - बुद्धिमत्ता संवर्धन केंद्र, ज्ञान प्रबोधिनी, पुणे ☎ २४२०७१९४

रसायनी - सौ.शुभदा कोकीळ ☎ ९८८१९०३६७३
वाशी - सौ. विजयालक्ष्मी पाटगावकर ☎ २२-२७८०१९६८

### विभाग ४. रत्नागिरी (रत्नागिरी, सिंधुदुर्ग )

रत्नागिरी - सौ. प्रतिभा प्रभुदेसाई ☎ २३५२-२२२९५३
पावस - सौ. शीतल सामंत ☎ ९४२११३९५३०
चिपळूण - श्री. प्रसाद काणे ☎ ९४२२४३०९००
गुहागर - श्रीमती मीरा साठे ☎ ९४२११४१५२८
राजापूर - श्री. संजय कुलकर्णी ☎ ९४२१२२९७५७
खेड - सौ. नम्रता दामले ☎ ९४२२४३३९४९
कुडाळ - श्री. उमेश सामंत ☎ ९४२२९६३५१७
सावंतवाडी - सौ. वंदना करंबेळकर ☎ ९८५०४७३०१२
कणकवली - श्री. औदुंबर भागवत ☎ ९४२११४७५१३
तळेरे - डॉ. मनीषा नारकर ☎ ९४२२४३५४०१
लांजा - डॉ. अशोक शहाणे ☎ ९४२११८९२४७

### विभाग ५. फोंडा (गोवा)

फोंडा - श्री. मोहन आमशेकर ☎ ९४२२०५८८७३
मार्दोळ - श्री. शिरीष आमशेकर ☎ ९४२११५८९२२
वास्को - सौ. दीपा गावकर ☎ ९९२१८९७०९६
परवरी - श्री. वल्लभ केळकर ☎ ९४२०८१८४८३
म्हापसा - श्री. प्रशांत बर्वे ☎ ९४२२४५६५५५
डिचोली - श्री. गणेश जोशी ☎ ९४०५९२१२३१

### विभाग ६. इचलकरंजी (कोल्हापूर)

इचलकरंजी - श्री.विनायक गद्रे ☎ ९८८१५९००१८
कुरुंदवाड - श्री. गोपाळ जोशी ☎ ९८५०९६४८१९
हुपरी - सौ. सुधा सांगवडेकर ☎ ९०२८८५२०५२
महागाव - श्री. सुभाष सुतार ☎ ९०९६७१२८१३

### विभाग ७. सांगली

सांगली - श्री. शैलेंद्र केळकर ☎ ९४२२६१६०५८
तासगाव - श्री. प्रसाद हसबनीस ☎ ९४२३८१०४०९
३२ शिराळे - श्री. नाथाराव हसबनीस ☎ ९७६७६८०७०१
कडेगाव - डॉ. मकरंद बर्वे ☎ ९९२२२१२९०३
इस्लामपूर - सौ. स्वाती कुलकर्णी ☎ ९४०४३५९२६२
मिरज - श्री. श्रीकांत कुलकर्णी ☎ ९३७२२२३४८५

### विभाग ८. सातारा

सातारा - श्री. सतीश कुलकर्णी ☎ ९४२३२६०२६०
कोरेगाव - डॉ. मिलिंद शहा ☎ ९८२२०२३२०८
कराड - श्री. दत्तात्रय कुलकर्णी ☎ २१६४-२२२५०५
उंब्रज - डॉ. धनंजय कुलकर्णी ☎ ९४०३५४६९१३
खंडाळा - श्री. अरुण फाळके ☎ ९८९०६०९६३१

पाटण - श्री. दत्तात्रय नांगरे ☎ ८२७५४५७२७८

### विभाग ९. सोलापूर

सोलापूर - ज्ञान प्रबोधिनी ☎ ०२१७-२३१७७८२
पंढरपूर - श्री. दीपक इरकल ☎ ९४२३५६३८९५

### विभाग १०. कर्जत (अहमदनगर)

नगर - सौ. स्नेहल धर्माधिकारी ☎ ९४२२०८४६१३
संगमनेर - श्री. अशोक भारंबे ☎ ९९२१६४४२११
कोपरगाव - डॉ. अंजली फडके ☎ ९३२५९५०१२१
शिर्डी - डॉ. प्रबोध जोशी ☎ ९४२१५५८४६६
कर्जत - श्री. गजानन चावरे ☎ ९९६०११८५८६
पारनेर - सौ. सविता रेपाळे ☎ ९९२२२५१६६७
श्रीगोंदा - श्री. महेशकुमार शिंदे ☎ ९९२१२७९४१६

### विभाग ११. उत्तर महाराष्ट्र

नाशिक - श्री. अनिल दंडगव्हाळ ☎ ९४२२२४८२६४
मालेगाव - डॉ. रागिणी भेलसेकर ☎ ९५०३२२२३९६
धुळे - श्री. एन. एम. जोशी ☎ ९४२१५००८८२
देऊर बु।। - श्रीमती स्वरूपा देवरे ☎ ७५८८६२८८११
साक्री - श्री. चंद्रकांत पंचभाई ☎ ९४२१५३७५०४
शिरपूर - प्रा. वैशाली पाटील-देवरे ☎ ९८२३२९९९७३
दोंडाईचा - श्री. सुभाष जैन ☎ ९८२३४१६८४४
नंदूरबार - डॉ. वैशाली काणे ☎ ९४२३९८०२९६
शहादा - सौ. सुनीता पटेल ☎ ९४२०२७११०१
जळगाव - श्री. अनिल भोळे ☎ ९४२०६६२७१४
अमळनेर - श्री. दत्तात्रय सोनावणे ☎ ९४२०१११८८२
चोपडा - श्री. सुधाकर केंगे ☎ ९४२३९१५५२९
चाळीसगाव - डॉ. मुकुंद करंबेळकर ☎ ९८२२२६३२७९
भुसावळ - श्री. अनिल जोशी ☎ ९३२६११८०२८

### विभाग १२. मराठवाडा

औरंगाबाद - सौ. भारती कुलकर्णी ☎ ९३२४०११३४९
जालना - श्री. विजय देशमुख ☎ ९४२३४५७६५५
बीड - श्री. कैलास लिंगे ☎ ९८८१४५१३५७
अंबाजोगाई - ज्ञान प्रबोधिनी ☎ ९४२१६२२६०९
माजलगाव - श्री. निरंजन वाघमारे ☎ ९८८१८६७१२३
धाराशिव - श्री. बालाजी माळी ☎ ९४०३३९११०६
हराळी - ज्ञान प्रबोधिनी ☎ ८८८८८०२६०४
लातूर - श्री. अमोल होनमाळे ☎ ८१४९९६०५५५
परभणी - श्री. प्रताप देशपांडे ☎ ९४०४९७४६१९
सेलू - श्री. भालचंद्र गांजापूरकर-जोशी ☎ ९४२२८६९५२२
नांदेड - सौ. मीरा तातोडे ☎ ९८८१०९१०५४



**माझी साळा 'माय' माझी, जणू साधीभोळी। भरते ती प्रेमभरे लेकरांची झोळी।।**

**जरूर वाचा : त्रिमितीची किमया –** अभ्यासविषयक/ कृतिपर पुस्तक – – छात्र प्रबोधन प्रकाशन – **मूल्य ₹ ८०**



**७वी ते ९वीच्या मुलामुलींसाठी- सामूहिक विद्याव्रत संस्कार -** संत्रिका व संवादिनी, ज्ञान प्रबोधिनी, पुणे ☎ २४२०७२२२

### विभाग १३. विदर्भ

| | | |
|---|---|---|
| अकोला | - श्री. भूषण बापट | ☎ ९८५०३८६४९४ |
| अमरावती | - श्री. प्रदीप व्यवहारे | ☎ ९८६०६७४७७२ |
| वर्धा | - श्री. मंदार देशपांडे | ☎ ९४२०४१५६४८ |
| उमरखेड | - श्री. धनंजय कुदे | ☎ ९४०३४६००४८ |
| चंद्रपूर | - श्री. मुकुंद घरोटे | ☎ ९०११६३१६५८ |
| वरोरा | - श्री. उमेश लाभे | ☎ ९४०३२४२७०५ |

### विभाग १४. पुणे

| | | |
|---|---|---|
| पुणे शहर | - छात्र प्रबोधन मुख्य केंद्र | ☎ २०-२४२०७१७४ |
| निगडी | - ज्ञा.प्र. नवनगर विद्यालय | ☎ २०-२७६५४३८० |
| चिखली | - श्री. गौतम इंगळे | ☎ ९७३०२३७३८८ |
| साळुंब्रे | - ग्राम प्रबोधिनी विद्यालय | ☎ २११४-२२३३७१ |
| शिवापूर | - श्री. संजीव तागडे | ☎ २०-२४३८४०१३ |
| इंदापूर | - श्री. तुषार रंजनकर | ☎ ९४२२३२९६१६ |
| चाकण | - डॉ. अविनाश अरगडे | ☎ ९४२३५७१५५२ |
| शिरूर (घोडनदी) | -श्री. प्रशांत अवचट | ☎ ९८८१०४९४३८ |
| बारामती | - सौ. मयुरा कानिटकर | ☎ ९४२३५८४३२४ |
| सासवड | - सौ. कल्पना खांडेकर | ☎ ९४२३२०८१०१ |
| भोर | - सौ. शुभांगी मुकादम | ☎ ९६२३०९३९६० |

**अधिकाधिक गावांमध्ये छात्र प्रबोधनची नोंदणी व वितरण केंद्रे व्हावीत यासाठी सभासदांना आवाहन!**

महाराष्ट्रातल्या प्रत्येक जिल्ह्यात आणि प्रत्येक तालु यात छात्र प्रबोधनचे दिवाळी अंक नोंदणी व वितरण केंद्र सुरू व्हावे, यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोतच. त्याला तुमचीही साथ हवी आहे. तुम्ही स्वत: किंवा तुमच्या परिचितांपैकी कोणी आपल्या गावात छात्र प्रबोधनचे केंद्र सुरू करू शकणार असेल, तर त्यांचे मन:पूर्वक स्वागत आहे. त्यांनी किमान **५० दीपावली अंकांची नोंदणी करावी व मासिकाचे किमान ५ सभासद** करावेत ही अपेक्षा आहे. अर्थातच हे काम स्वयंस्फूर्तपणे, छात्र प्रबोधनवरील प्रेमापोटी, आपल्या गावातील अधिकाधिक मुलामुलींपर्यंत दर्जेदार अंक पोहोचावा, या हेतूने करावयाचे आहे. तुम्हाला आवश्यक ते प्रचार साहित्य पाठवले जाईल व दिवाळी अंक आमच्या खर्चाने तुमच्यापर्यंत पोहोचवले जातील.



## प्रतिसादी वाचकवीर व्हा... ६

### हा अंक वाचा... प्रश्नांची उत्तरे लिहून पाठवा... आणि बक्षीस मिळवा...

दर महिन्याचा 'छात्र प्रबोधन'चा अंक तुम्ही आवडीने वाचत असालच. छात्र प्रबोधनच्या वासंतिक अंकापासून (चैत्र/एप्रिल) त्या-त्या अंकावर आधारित काही प्रश्न दर महिन्याच्या छात्र प्रबोधनच्या अंकात देत असतो. **या अंकातील प्रश्नांची उत्तरे दि. १० ऑ टोबर २०१४ पर्यंत** 'छात्र प्रबोधन'कडे पाठवा. बक्षीस जिंकण्याची प्रत्येकाला संधी. या निमित्ताने तुम्ही प्रत्येक अंक बारकाईने वाचाल व अंकातील साहित्याचा अधिक आनंद मिळवाल, असा विश्वास आहे.

१. 'माणूस म्हणून घडविणारे पाटील गुरुजी' या लेखात, पाटील गुरुजींची कोणती स्वभाव वैशिष्ट्ये लेखकाला भावतात?
२. 'संवाद कौशल्य' या लेखमालेत संवादातील अडथळे कशाप्रकारे दूर करता येतील, असे लेखिकेला वाटते?
३. तुमच्या दृष्टीने 'खराखुरा स्मार्टनेस' म्हणजे काय? हे ८ ते १० ओळीत (सुमारे ५० ते ७० शब्दात) लिहून पाठवा.
४. 'डॉ. पांडुरंग वामन काणे' यांना कोणत्या योगदानाबद्दल 'भारतरत्न' हा पुरस्कार बहाल करण्यात आला. संदर्भ : संस्था परिचय – भांडारकर प्राच्यविद्या संशोधन मंदिर.
५. 'चांदणी' चांदीच्या पंचवीस नाण्यांची मालकीण कशी बनली?
६. 'एम फॉर मराठी' या नाट्यछटेतल्या ताईने मराठी भाषेविषयी कोणती भीती व्य त केली आहे?

**'प्रतिसादी वाचकवीर व्हा...' या प्रश्नावलीची उत्तरे पाठवलेल्या खालील सभासदांचे मन:पूर्वक अभिनंदन !!!**

**कु. भार्गवी देशपांडे,** इ. ७ वी, पंढरपूर, **चि. प्रथमेश डोळे,** इ. ९ वी, कऱ्हाड, **कु. मृण्मयी भगत,** मुरुड-जंजिरा

हे मासिक ज्ञान प्रबोधिनी या संस्थेच्या मालकीचे असून मुद्रक, प्रकाशक व संपादक श्री. महेन्द्र सेठिया यांनी राष्ट्रीय सौर १० भाद्रपद, शके १९३६, १ सप्टेंबर २०१४ या दिवशी बालोद्यान प्रेस, नातूबाग, शुक्रवार पेठ, पुणे -२ येथे छापून, ज्ञान प्रबोधिनी, ५१०, सदाशिव पेठ, पुणे - ३० येथून प्रसिद्ध केले.

## छात्र प्रबोधनतर्फे नावीन्यपूर्ण राज्यस्तरीय सांघिक स्पर्धा : २०१४-१५
## (इ. ७वी ते १०वीच्या विद्यार्थ्यांसाठी)

**दिवाळीचा सुट्टीचा स्पर्धांच्या तयारीसाठी पुरेपूर वापर करा. एकाच शाळेतील अथवा वेगवेगळ्या शाळांतील मित्र–मैत्रिणींचा गट करून मोठ्या संख्येने या स्पर्धांमध्ये सहभागी व्हा. तुमच्यातल्या कल्पकतेला व विविध कला गुणांना व्यक्त होण्याची संधी द्या... स्पर्धेसाठी कोणतेही प्रवेश शुल्क नाही.**

### ✻ ध्वनिफीत स्पर्धा (३० मिनिटांची, ४ ते ६ जणांचा गट)

**स्पर्धेचे तपशील** – • 'छात्र प्रबोधन'च्या अंकांतील साहित्याचा वापर यामध्ये करावा. • या स्पर्धेमध्ये आवाज विद्यार्थ्यांचा असावा. • फक्त समुहगीते किंवा नाटक असा एकच प्रकार न वापरता सादरीकरणाच्या विविध प्रकारांचे योग्य मिश्रण हवे. • ध्वनिफितीस योग्य शीर्षक व शीर्षक गीत असावे. • संगीताचा अतिरेक टाळावा. योग्य ठिकाणी योग्य प्रकारे संगीत द्यावे. संगीतही विद्यार्थ्यांनी दिलेले असावे. • आशयातील वैविध्य,कल्पनांचे नावीन्य, आवाजाची स्पष्टता, मांडणी, संगीत, सहभागी विद्यार्थी संख्या या गोष्टींना महत्त्व दिले जाईल. • ध्वनिफीत तयार करण्यासाठी मोठ्यांचे मार्गदर्शन घेण्यास हरकत नाही.

### ✻ व्हिडिओ क्लिप स्पर्धा (३ ते ४ जणांचा गट)

**स्पर्धेचे तपशील –** • आपल्या गावातील कोणत्याही एका प्रश्नावर (सांडपाणी व्यवस्थापन, कचर व्यवस्थापन, पाणीपुरवठा व्यवस्थापन ) १० ते १५ मि. व्हिडिओ क्लिप तयार करावी. • व्हिडिओ क्लिप ही मराठी भाषेत असावी.
• आवाज विद्यार्थ्यांचाच असावा. • प्रश्नांची मांडणी मुद्देसूद असावी. • प्रश्नांची निवड, वापरलेले संदर्भ, एकत्रित परिणाम, व्हिडिओची गुणवत्ता, संपादन यांद्वारे गुणांकन केले जाईल. • शाळेतील शिक्षक व पालकांचे मार्गदर्शन घेण्यास हरकत नाही.

**वरील दोन्ही स्पर्धांचे साहित्य सीडी/डीव्हीडी च्या रूपात छात्र प्रबोधनच्या मुख्य कार्यालयात पाठवावे.**

**दोन्ही स्पर्धांची बक्षिसे - प्रथम ₹ ७००/-, द्वितीय ₹ ५००/-, तृतीय ₹ ४००/-**

### ✻ 'तुम्हीच संपादक व्हा !' हस्तलिखित स्पर्धा - (५ ते ८ जणांचा गट)

• हस्तलिखित ५० ते ५५ पृष्ठसंख्येचे असावे • हस्तलिखितातील २५ पानांचा एक भाग कोणत्याही एका विषयावर लिहिलेला असावा. विविध लेखन प्रकारांचा त्यामध्ये समावेश असावा. • दुसरा भाग संमिश्र असावा. त्याला विषयाचे बंधन नाही. वैविध्यपूर्णलेखन विषय व लेखन प्रकार यात असावेत.

**दोन्ही पैकी कोणत्याही एका भागात खालील गोष्टींचा समावेश करावा – १.** आत्मवृत्त – कोणत्याही एका निर्जीव वस्तूचे आत्मवृत्त.२. नाट्यछटा. ३. कल्पक विचार – गटामध्ये कल्पना स्फोटाचे तंत्र वापरून खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर २५ कल्पना लिहा. (कल्पना स्फोटाचे तंत्र छात्र प्रबोधनच्या वेबसाईटवर पहायला मिळेल.) ♦ माणसाला पाण्याखाली वस्ती करून राहाता आले तर ♦ जगातील सर्व फुले पिवळी झाली तर काय होईल? ♦ जगात नेहमी युद्धे होतच राहतात कारण...
♦ आपल्या मोठ्या शहरात अलिशान इमारतींच्या जोडीने झोपडपट्ट्याही दिसतात कारण...
४. आपल्या परिसरातील सार्वजनिक स्वच्छतेचे सर्वेक्षण करून त्यावर उपाय सुचवा. ५. एखादी भावना व्यक्त करणारी १० ते १५ वाक्ये लिहा. ६. 'छात्र प्रबोधन'च्या कोणत्याही एका अंकाचे रसग्रहण/परिक्षण/सूचना यावर लेख

**बक्षिसे – प्रथम ₹ १०००/–, द्वितीय ₹ ८००/–, तृतीय ₹ ६०० , उत्तेजनार्थ ₹ ४००/–**

**विशेष संधी –** क्रमांक प्राप्त हस्तलिखितातील सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांना परस्पर सोयीनुसार मे व जून महिन्यातील 'छात्र प्रबोधनच्या' संपादकीय कामाचा ४ दिवस अनुभव घेण्याची संधी मिळेल.

पहिल्या ३ क्रमांकांना पुस्तके व सीडी रूपाने बक्षिसे दिली जातील. विशेष गुणवत्ता प्राप्त सर्वांना प्रशस्ती पत्रके !
सर्व स्पर्धांची नोंदणी छात्र प्रबोधनच्या ईमेलवर अथवा पत्राद्वारे **३१ डिसें. २०१४** पूर्वी करणे आवश्यक.

**सर्व स्पर्धांसाठीचे साहित्य पाठविण्याचा अंतिम दिनांक ३१ जानेवारी २०१५**

सौर भाद्रपद, शके १९३६/सप्टेंबर २०१४ पंजीकृत नियतकालिक, ISSN 2279 - 0691 Chhatra Prabodhan
प्रकाशन दिनांक : सौर १० भाद्रपद, शके १९३६ /१ सप्टेंबर २०१४
पंजीकरण क्रमांक (RNINO.)MAHMAR/2000/5636 घोषणापत्र क्रमांक : (PHM/SR/201/VIII/2001)
टपालाने सवलतीच्या दरात पाठविण्याचा परवाना क्रमांक : PCW/050 / 2012 - 2014,
तिकिटाशिवाय पाठविण्याचा परवाना क्रमांक : WPP- 21.Published & Posted at S.P. Post Office On 1st of Every Month



**जल-फेनाचे सौंदर्य**

एखादा जलप्रपात जेव्हा उंचावरून जमिनीवर कोसळतो त्यावेळी निर्माण होणारा फेस खाली वाहात येऊन स्थिर होताना विविध सौंदर्याकार धारण करतो... त्यापैकीच हा एक जल-फेनाचा (फेसाचा) हा आविष्कार. अमेरिकेत दुपारी तीनच्या सुमारास १३५ मि.मि. निकॉन लेन्सने कॅमेऱ्यात टिपलेले हे एक दृश्य.

– प्रकाश जोगळेकर, दत्तवाडी, पुणे

पत्त्यामध्ये चुका असल्यास अथवा पिन कोड क्रमांक नसल्यास कळवा.

**सौर दिनदर्शिका शके १९३६**

| | सप्टेंबर २०१४ | भाद्रपद आश्विन |
|---|---|---|
| सो. | 1 | १० |
| मं. | 2 | ११ |
| बु. | 3 | १२ |
| गु. | 4 | १३ |
| शु. | 5 | १४ |
| श. | 6 | १५ |
| र. | 7 | १६ |
| सो. | 8 | १७ |
| मं. | 9 | १८ |
| बु. | 10 | १९ |
| गु. | 11 | २० |
| शु. | 12 | २१ |
| श. | 13 | २२ |
| र. | 14 | २३ |
| सो. | 15 | २४ |
| मं. | 16 | २५ |
| बु. | 17 | २६ |
| गु. | 18 | २७ |
| शु. | 19 | २८ |
| श. | 20 | २९ |
| र. | 21 | ३० |
| सो. | 22 | ३१ |
| मं. | 23 | आ. १ |
| बु. | 24 | २ |
| गु. | 25 | ३ |
| शु. | 26 | ४ |
| श. | 27 | ५ |
| र. | 28 | ६ |
| सो. | 29 | ७ |
| मं. | 30 | ८ |

**संपर्क पत्ता :**
छात्र प्रबोधन, ज्ञान प्रबोधिनी
५१० सदाशिव पेठ, पुणे 411030
☎ (०२०)२४२०७ १७४/१७९
www.chhatraprabodhan.org
ई-मेल : chhatraprabodhan@jnanaprabodhini.org

**या अंकाची किंमत : ₹ १५/-**
**वार्षिक वर्गणी : ₹ १८०/-**

**प्रिय पोस्टमन,**

हा अंक तुम्ही आमच्या लाडक्या मुलामुलींपर्यंत पोहोचवून फार मोठं काम करता. मुलंमुली या मासिकाची फार आतुरतेने वाट पाहात असतात. मासिक वेळेवर मिळाले नाही अथवा मिळालेच नाही तर ती नाराज होतात, त्यांचा तुमच्यावरचा अन् आमच्यावरचाही विश्वास कमी होतो. असं झालेलं तुम्हालाही निश्चितच आवडणार नाही. हो ना !

तेव्हा हे मासिक खात्रीशीरपणे, विनाविलंब शेजारच्या (→) पत्त्यावर द्यावे ही आपुलकीच्या नात्याने विनंती,

तुमचा-संपादक, छात्र प्रबोधन.

प्रति –